## आजचे पंचांग

मंगळवार, दि. १० फेब्रुवारी
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर
युगाब्द ५१२७, शालिवाहन शक १९४७, विक्रम संवत २०८२
विश्वावसुनाम संवत्सर, उत्तरायण, शिशिर ऋतु
माघ मास, कृष्णपक्ष, अष्टमी सकाळी ७-२८ पर्यंत नंतर नवमी तिथी.
दिवस नक्षत्र– विशाखा सकाळी ७-५५ पर्यंत नंतर अनुराधा.

# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


## कर्नाटकात आक्षेपार्ह बॅनर

**बंगळुरू :** कर्नाटक विधानसभेसमोर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरोधात आक्षेपार्ह मजकूर असलेले बॅनर लावण्यात आल्याने राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. कर्नाटक प्रदेश युवा काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी हे बॅनर लावून केंद्र सरकार आणि पंतप्रधानांची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप भाजपने केला आहे. या प्रकरणी भाजपच्या शिष्टमंडळाने पोलीस उपायुक्तांची भेट घेऊन संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | मंगळवार, दि. १० फेब्रुवारी, २०२६ | वर्ष - १ | अंक - १३८ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### काश्मीरमध्ये शिक्षकांची पदे गोठवणार?

**जम्मू :** शिक्षणमंत्री सकीना इटू यांनी सोमवारी घोषणा केली की जम्मू आणि काश्मीरमधील शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता दूर करण्यासाठी सरकार शिक्षकांच्या पदांची गोठवणी रद्द करण्याचा सक्रियपणे विचार करत आहे. विधानसभेच्या अधिवेशनात भाजपचे आमदार पवन कुमार गुप्ता यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना, मंत्री महोदयांनी स्पष्ट केले की, २०१८ मध्ये उपराज्यपालांच्या नेतृत्वाखालील राज्य प्रशासकीय परिषदेने शिक्षक पदांची भरती गोठवली होती.

### दक्षिणेकडील राज्यांवर 'अन्याय'

**हैदराबाद :** तेलंगणाचे मुख्यमंत्री ए रेवंत रेड्डी यांनी सोमवारी केंद्रातील एनडीए सरकारवर दक्षिणेकडील राज्यांवर "अन्याय" केल्याचा आरोप केला आणि केंद्रीय निधी आणि विकास प्रकल्पांच्या वाटपात भाजप त्यांना "दुसऱ्या दर्जाचे नागरिक" म्हणून वागवते असा आरोप केला. "केरळ, तामिळनाडू, कर्नाटक किंवा तेलंगणा असो, दक्षिणेकडील राज्यांवर अन्याय होत आहे. ते हे जाणूनबुजून करत आहेत," असा आरोप त्यांनी केला.


### बेकायदा कॉल सेंटरवर ईडीची छापेमारी

**अहमदाबाद :** अहमदाबाद येथील एका बेकायदेशीर कॉल सेंटरच्या संचालकांवर छापे टाकून, ज्यांनी प्रामुख्याने अमेरिकेत परदेशी नागरिकांना "फसवले" होते, त्यांच्याविरुद्ध सुमारे १० लाख रुपयांचे क्रिप्टोकरन्सी आणि १३.५ लाख रुपयांची रोकड जप्त करण्यात आल्याचे अंमलबजावणी संचालनालयाने सांगितले. कॉल सेंटर ऑपरेटर्सनी अमेरिकन सरकारी एजन्सीजचे अधिकारी किंवा खासगी कंपन्यांचे प्रतिनिधी असल्याचे भासवत फसवणूक केली.

### काँग्रेसचा आरोप; पंतप्रधान कार्यालयाकडून लोकसभा सचिवालयाला निर्देश

# पीएम केअर निधी प्रश्नांवर बंदी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** संसदेत पीएम केअर फंड, पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधी आणि राष्ट्रीय संरक्षण निधी यांच्याशी संबंधित प्रश्न विचारले जाऊ नयेत, असे निर्देश थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यालयाकडून लोकसभा सचिवालयाला देण्यात आल्याचा गंभीर दावा काँग्रेसने सोमवारी केला आहे. या प्रकरणामुळे संसदेत पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि खासदारांच्या अधिकारांवरून नव्या वादाला तोंड फुटले आहे.

काँग्रेसने सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एका वृत्ताचा संदर्भ देत हा दावा केला. या अहवालानुसार, पंतप्रधान कार्यालयाने लोकसभा सचिवालयाला कळवले आहे की संसदेत कोणताही सदस्य पीएम केअर फंड, पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधी आणि राष्ट्रीय संरक्षण निधी यांच्याबाबत प्रश्न विचारणार नाही, याची विशेष काळजी घेण्यात यावी. काँग्रेसने यावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करत हा प्रकार थेट हुकूमशाहीचा असून संसदेचा अपमान आणि लोकप्रतिनिधींच्या अधिकारांवर हल्ला असल्याचे म्हटले आहे.

काँग्रेस नेत्यांच्या म्हणण्यानुसार, संसद ही सरकारला प्रश्न विचारण्यासाठी आणि जाब विचारण्यासाठी सर्वोच्च व्यासपीठ आहे. अशा निधींविषयी प्रश्न विचारण्यास मज्जाव करणे म्हणजे लोकशाही प्रक्रियेचे अवमूल्यन आहे. जनतेकडून मिळणाऱ्या निधीचा वापर कसा होतो, याबाबत संसदेला माहिती देणे ही सरकारची जबाबदारी असल्याचेही काँग्रेसने स्पष्ट केले आहे.

माध्यमातील वृत्तानुसार, ३० जानेवारी रोजी पंतप्रधान कार्यालयाने लोकसभा सचिवालयाला पत्र पाठवून कळवले की या तिन्ही निधींशी संबंधित प्रश्न आणि बाबी लोकसभेच्या कार्यपद्धती व कामकाज नियमांतील नियम ४१(२)(५) आणि ४१(२)(७५) अंतर्गत स्वीकारार्ह नाहीत. त्यामुळे अशा स्वरूपाचे प्रश्न संसदेत सूचीबद्ध करण्यात येऊ नयेत, असे या पत्रात नमूद करण्यात आल्याचे सांगितले जाते. पीएम केअर फंडाची स्थापना २७ मार्च २०२० रोजी देशात कोविड-१९ साथीचा उद्रेक झाल्यानंतर करण्यात आली होती. या निधीच्या अधिकृत माहितीनुसार, कोविडसारख्या आपत्कालीन परिस्थितीत तसेच भविष्यात उद्भवणाऱ्या कोणत्याही संकटात बाधित लोकांना मदत करण्यासाठी एका विशेष निधीची गरज लक्षात घेऊन 'प्राइम मिनिस्टर्स सिटीजन असिस्टन्स अँड रिलीफ इन इमर्जन्सी सिच्युएशन्स फंड' या नावाने हा निधी स्थापन करण्यात आला. हा निधी सार्वजनिक धर्मादाय विश्वस्त संस्था म्हणून नोंदणीकृत करण्यात आला असून, त्याचा ट्रस्ट डीड २७ मार्च २०२० रोजी नवी दिल्ली येथे नोंदवण्यात आला आहे. पीएम केअर फंडाच्या २०२२-२३ या आर्थिक वर्षातील पावत्या व देयकांच्या अहवालानुसार, मार्च २०२३ अखेरीस या निधीतील एकूण शिल्लक ६,२८३.७ कोटी रुपये होती.

पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधी आणि राष्ट्रीय संरक्षण निधी हे देखील पंतप्रधान कार्यालयाच्या नियंत्रणाखाली असून, या निधींविषयी संसदेत प्रश्न विचारण्यावर मर्यादा घालण्याचा निर्णय अत्यंत गंभीर असल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात आहे. सरकार आणि विरोधकांमध्ये जोरदार राजकीय संघर्ष होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### ऑनलाइन गेमिंगमुळे झटका!

# मेंदूची नस फुटल्याने तरुणाचा मृत्यू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मेरठ :** मेरठ येथून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. ऑनलाइन गेम खेळत असताना अचानक प्रकृती बिघडल्याने २३ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला.

कुटुंबीयांच्या माहितीनुसार गेम खेळताना त्याचा रक्तदाब अचानक वाढला आणि त्यानंतर त्याला डोकेदुखी व अस्वस्थता जाणवू लागली. काही वेळातच तो बेशुद्ध पडला. मृत तरुणाची ओळख मोहम्मद कैफ अशी आहे. तो बऱ्याच दिवसांपासून मोबाइलवर ऑनलाइन गेम खेळण्यात जास्त वेळ घालवत होता. घटनेच्या दिवशीही कानात इअरफोन लावून तो मोबाईलवर गेम खेळत होता. अचानक डोकं जोरात दुखू लागल्यानंतर तो जमिनीवर कोसळला. कुटुंबीयांनी तात्काळ त्याला जवळच्या रुग्णालयात दाखल केले. प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी त्याला दिल्लीतील सफदरजंग रुग्णालयात हलवण्यात आले. तिथे उपचार सुरू होते, मात्र डॉक्टरांना प्रयत्न करुनही जीव वाचवता आला नाही. रुग्णालयात दाखल करताना त्याचा रक्तदाब ३०० च्या पुढे गेला होता, ही अत्यंत धोकादायक पातळी आहे. डॉक्टरांनी मृत्यूचे कारण मेंदूत रक्तस्राव असल्यचे सांगितले. नातेवाईकांचे म्हणणे आहे की, कैफला गेमिंगची इतकी सवय लागली आहे, याची त्यांना पूर्ण कल्पना नव्हती. डॉक्टरांनी इशारा दिला आहे की, सतत स्क्रीनकडे पाहणे, ताणतणाव, झोपेचा अभाव यामुळे तरुणांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो.

# शरद पवार यांची प्रकृती स्थिर; डॉक्टरांची माहिती

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांना पुण्यातील रुबी हॉल क्लिनिकमध्ये दाखल करण्यात आले आहे. खोकल्याचा त्रास वाढल्याने आणि अस्वस्थ वाटू लागल्यामुळे त्यांना गोविंदबाग येथून कार्डिॲक रुग्णवाहिकेतून पुण्यात हलवण्यात आले. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे.

रुबी रुग्णालयात शरद पवारांवर उपचार करणारे डॉक्टर अभिजीत लोढा यांनी माहिती देताना सांगितले की, शरद पवार यांना कफचा त्रास असून, विविध तपासण्या करण्यात आल्या आहेत. तपासण्यांचे अहवाल येतील. त्यानंतर पुढील उपचार पुण्यातच करायचे की मुंबईला हलवायचे, याबाबत निर्णय घेतला जाईल, असे डॉक्टरांनी सांगितले.

डॉ. लोढा यांच्या म्हणण्यानुसार, गेल्या दोन ते तीन दिवसांपासून शारीरिक दगदगीमुळे शरद पवार यांना त्रास होत होता. छातीत कफ साचल्याने कंजेशन झाले असून त्यामुळे श्वसनास अडचण जाणवत होती. मात्र सध्या काळजी करण्यासारखी परिस्थिती नाही. शरद पवार यांना आयसीयूमध्ये दाखल करण्यात आलेले नसून ते एका खासगी खोलीत आहेत. त्यांची प्रकृती सामान्य आहे, असेही डॉक्टरांनी स्पष्ट केले.

### जिल्हा परिषद निकालांनी ग्रामीण महाराष्ट्रातही वर्चस्व सिद्ध

# सलग चार निवडणुकांत भाजपच अव्वल

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** विधानसभा, नगरपालिका, महापालिका आणि आता जिल्हा परिषद-पंचायत समिती अशा सलग चार निवडणुकांत भारतीय जनता पक्षाने राज्यात नंबर एकचा पक्ष म्हणून आपले स्थान अधिक भक्कम केले आहे. विधानसभा निवडणुकीत १३२ आमदार, नगरपालिका निवडणुकांत १३० नगराध्यक्ष आणि जवळपास तीन हजार नगरसेवक, २९ महापालिकांपैकी २२ ठिकाणी सत्ता आणि आता जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांतही भाजपने आघाडी कायम राखली आहे.

अजित पवार यांच्या निधनानंतर जिल्हा परिषद निवडणुकीसाठी एकही सभा न घेण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला होता. त्यानुसार त्यांनी प्रचार सभा, रॅली किंवा भाषण केले नाही. तरीही भाजपने या निवडणुकांत प्रभावी कामगिरी केली, हे निकालांतून स्पष्ट झाले आहे.

मुख्यमंत्री प्रचारात उतरले नसले तरी भाजपने स्थानिक नेत्यांवर जबाबदारी सोपवत निवडणूक यंत्रणा सक्रिय ठेवली होती. मराठवाड्याची जबाबदारी रावसाहेब दानवे आणि चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे होती. नांदेडमध्ये अशोक चव्हाण, परभणीत मेघना बोर्डीकर सक्रिय होत्या. पश्चिम महाराष्ट्रात चंद्रकांत पाटील, जयकुमार गोरे आणि धनंजय महाडिक यांनी सूत्रे हाती घेतली, तर उत्तर महाराष्ट्रात गिरीश महाजन यांनी आघाडी घेतली. कोकणात नितेश राणे आणि रविंद्र चव्हाण यांनी जबाबदारी सांभाळली. प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण आणि बावनकुळे यांनी संपूर्ण राज्यावर लक्ष ठेवले.

स्थानिक नेत्यांच्या छोट्या-मोठ्या सभा आणि संघटनात्मक कामाच्या जोरावर भाजप महाराष्ट्रात पुन्हा एकदा सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. या यशाच्या आधारे भाजप आता २०२९ च्या निवडणुकांसाठी स्वबळावर लढण्याची गणिते मांडत असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. त्यामुळे भाजपची वाढलेली ताकद ही मित्रपक्षांसाठीही इशारा मानली जात आहे.

२०१४ ते २०२४ या दशकात राज्यात विधानसभेच्या तीन आणि लोकसभेच्या तीन निवडणुका झाल्या. या निवडणुकांत भाजपच्या मतांची टक्केवारी साधारण २५ ते २८ टक्क्यांच्या दरम्यान राहिली. विधानसभा निवडणुकीत भाजपला २६ टक्के, शिवसेनेला १२ टक्के आणि राष्ट्रवादीला ९ टक्के मते मिळाली होती. २०२९ मध्ये स्वबळावर सत्ता मिळवायची असल्यास भाजपला सुमारे ४० टक्के मतांचा टप्पा गाठावा लागणार आहे. त्यासाठीच पक्षाने ग्रामीण महाराष्ट्र मजबूत करण्यावर भर दिला असून, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पूर्ण ताकदीने लढवल्या.

२०१७ च्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांत शरद पवार आणि अजित पवार एकत्र असताना राष्ट्रवादी काँग्रेस सर्वात मोठा पक्ष ठरला होता. ग्रामीण महाराष्ट्रावर राष्ट्रवादीचे वर्चस्व असल्याचे समीकरण त्या वेळी होते. मात्र अलीकडील नगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकांत भाजपने ग्रामीण भागातही आघाडी घेत हे समीकरण बदलल्याचे चित्र आता स्पष्ट झाले आहे.

# महाराष्ट्रात ७० हजार पदांची मेगाभरती जाहीर

### उत्तरप्रदेशातील नव्या पद्धतीने प्रक्रिया राबवणार, फडणवीसांची घोषणा

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**मुंबई :** राज्यात लवकरच सुमारे ७० हजार पदांची नोकरभरती टप्प्याटप्प्याने राबवण्यात येणार असून, ही भरती नव्या व अधिक पारदर्शक पद्धतीने केली जाणार आहे, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी केली. भरती प्रक्रियेत आवश्यक कौशल्ये, सेवा प्रवेशाचे निकष, पात्रता आणि कामाच्या स्वरूपानुसार निर्णय घेण्याचे स्पष्ट निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले आहेत.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृहात सेवा प्रवेश नियमावलीतील सुधारणा संदर्भात बैठक पार पडली. या बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह सर्व अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव आणि सचिव उपस्थित होते.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सुमारे २० हजार पदे भरली जाणार असून, उर्वरित पदे आयोगाबाहेरील विविध विभागांतील असतील. मनुष्यबळ व्यवस्थापन आणि भरती प्रक्रियेत पारदर्शकता हे प्रमुख उद्दिष्ट राहणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. राज्य प्रशासनातील महत्त्वाच्या विभागांमध्ये सर्वांगीण सुधारणा वेगाने राबवण्याची गरज असल्याचे फडणवीस म्हणाले. सामान्य प्रशासन विभाग हा केवळ औपचारिक विभाग नसून, संपूर्ण शासकीय भरती व्यवस्थेचा कणा असल्याचे त्यांनी नमूद केले. विविध विभागांत ७० हजार पदे भरल्यानंतर प्रशासनाची कार्यक्षमता लक्षणीयरीत्या वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

भरती प्रक्रियेत अनावश्यक कागदपत्रे, लांब रांगा आणि विलंब टाळण्यासाठी ऑनलाईन आणि डिजिटल पडताळणी प्रणाली विकसित करण्यावर भर देण्यात येणार आहे. पासपोर्टसारख्या संवेदनशील कागदपत्रांची ऑनलाईन पडताळणी शक्य असल्यास, इतर प्रमाणपत्रांसाठीही हीच पद्धत वापरता येईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.


प्रमाणपत्रांची पडताळणी अधिक सुरक्षित आणि विश्वासार्ह करण्यासाठी ब्लॉकचेन तंत्रज्ञानासह डीजीलॉकर प्रणालीचा वापर करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. भरती प्रक्रियेत कोणताही संशय, पक्षपात किंवा अन्याय होऊ नये, यासाठी संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक, स्वच्छ आणि वेगवान असणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

### फडणवीसांकडून विरोधकांवर टीका

**मुंबई :** जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या निकालांत भारतीय जनता पक्षाने लक्षवेधी यश मिळवले आहे. राज्यातील १२ जिल्हा परिषदांपैकी सात जिल्हा परिषदांवर भाजपने एकहाती सत्ता मिळवली असून, पंचायत समिती निवडणुकांत भाजपने ४१० जागांवर विजय मिळवला आहे. या निकालांनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाधान व्यक्त करताना विरोधकांवर जोरदार टीका केली. राज्यातील जनतेने पुन्हा एकदा महायुतीवर विश्वास दाखवला असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. १२ जिल्हा परिषदांपैकी सात ठिकाणी भाजप सर्वांत मोठा पक्ष ठरला आहे. मित्रपक्षांनाही समाधानकारक यश मिळाले आहे, असे ते म्हणाले.

# आजपासून बारावीच्या परीक्षांना सुरुवात

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** राज्यात आजपासून इयत्ता बारावीच्या परीक्षांना सुरुवात झाली आहे. ही परीक्षा १० फेब्रुवारी ते १८ मार्चदरम्यान होणार असून, इयत्ता दहावीची परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीत घेतली जाणार आहे.

यंदा राज्यभरातून १५ लाख ३२ हजार ४८७ विद्यार्थी बारावीच्या परीक्षेला बसत आहेत. ही परीक्षा ३३८७ परीक्षा केंद्रांवर पार पडणार आहे. शाखानिहाय विचार करता, विज्ञान शाखेचे ७ लाख ९९ हजार ७७३ विद्यार्थी, कला शाखेचे ३ लाख ८० हजार ६९२ विद्यार्थी आणि वाणिज्य शाखेचे ३ लाख २० हजार १५२ विद्यार्थी परीक्षेला सामोरे जात आहेत. याशिवाय किमान कौशल्य अभ्यासक्रम आणि आयटीआय तांत्रिक अभ्यासक्रमांचे काही विद्यार्थीही या परीक्षेत सहभागी होत आहेत. कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू नये यासाठी ३ फेब्रुवारीपर्यंत परीक्षेचे अर्ज स्वीकारण्यात आले होते. विद्यार्थ्यांना मानसिक आधार मिळावा यासाठी यंदा प्रत्येक जिल्ह्यात दोन समुपदेशकांची नियुक्ती करण्यात आली असून, बोर्ड स्तरावरही दहा समुपदेशक कार्यरत असणार आहेत. हे समुपदेशक विद्यार्थ्यांच्या अडचणी आणि समस्यांवर मार्गदर्शन करणार आहेत. परीक्षा काही विषयांसाठी सकाळी ११ वाजता, तर काही विषयांसाठी दुपारी ३ वाजता घेतली जाणार आहे. विद्यार्थ्यांना परीक्षा सुरू होण्याच्या किमान अर्धा तास आधी परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे बंधनकारक आहे.

यंदाच्या परीक्षेत प्रश्नपत्रिका वाचनाच्या वेळेबाबत महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. यापूर्वी सकाळी ११ वाजता परीक्षा सुरू होण्यापूर्वी १० मिनिटांचा वेळ प्रश्नपत्रिका वाचनासाठी दिला जात होता. मात्र, यंदा परीक्षा सुरू झाल्यानंतर पहिली १० मिनिटे प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी देण्यात येणार असून, हा वेळ परीक्षेच्या शेवटी जोडण्यात येणार आहे.

### अजित पवारांच्या पक्षाने बहुमताचा टप्पा ओलांडला

# पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेसची एकहाती सत्ता

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांसाठी ७ फेब्रुवारी रोजी मतदान पार पडल्यानंतर सोमवारी, ९ फेब्रुवारीला निकाल जाहीर झाले. या निकालांत पुणे जिल्हा परिषदेत अजित पवारांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसने स्पष्ट बहुमत मिळवत एकहाती सत्ता स्थापन केली आहे.

पुणे जिल्हा परिषदेसाठी ७३ गटांमध्ये सुमारे २९९ उमेदवार निवडणूक रिंगणात होते. तसेच १३ पंचायत समित्यांच्या १४६ गणांसाठी जवळपास ५२८ उमेदवारांनी आपले नशीब आजमावले होते. त्यामुळे पुण्यातील सत्तासमीकरण नेमके कसे असेल, याकडे राजकीय वर्तुळासह जनतेचेही लक्ष लागले होते.

जाहीर झालेल्या आकडेवारीनुसार, पुणे जिल्हा परिषदेत राष्ट्रवादी काँग्रेसने ३७ च्या बहुमताचा आकडा सहज पार केला आहे. एकूण ७३ जागांपैकी राष्ट्रवादीला ४७ जागांवर विजय मिळाला. भाजपला ९, शिवसेनेला ४, ठाकरे गटाला ६ तर शरद पवार गटाला १ जागा मिळाली. काँग्रेस आणि अपक्षांना एकही जागा मिळालेली नाही.

ग्रामीण भागात संघटन मजबूत ठेवणे, स्थानिक प्रश्नांवर लक्ष केंद्रित करणे आणि तुलनेने सक्षम उमेदवारांची निवड या बाबींचा राष्ट्रवादीला मोठा फायदा झाल्याचे चित्र निकालांतून स्पष्ट झाले. अनेक मतदारसंघांत चुरशीच्या लढती झाल्या, मात्र निर्णायक टप्प्यावर राष्ट्रवादीने आघाडी घेतली.

२०१७ च्या पुणे जिल्हा परिषद निवडणुकांत राष्ट्रवादीला ४४ जागा मिळाल्या होत्या. यंदा त्यापेक्षा अधिक जागांवर विजय मिळवत पक्षाने आपले वर्चस्व अधिक भक्कम केले आहे. त्या वेळी भाजपला ७, शिवसेनेला १३, काँग्रेसला ७ आणि इतरांना ४ जागा मिळाल्या होत्या.

दरम्यान, मावळ तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसने दणदणीत विजय मिळवला. निकालानंतर कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण दिसून आले. मात्र, अजित पवार यांच्या निधनानंतर झालेल्या या निवडणुकीत विजय मिळूनही कार्यकर्त्यांमध्ये भावनिक भावना व्यक्त होत असल्याचे चित्र दिसले.

शिरूर तालुक्यात राष्ट्रवादीच्या उमेदवार वृषाली वाळके यांनी पोस्टल मतांसह ५६ मतांनी विजय मिळवला असून, भाजपकडून फेरमोजणीची मागणी करण्यात आली आहे.

एकूणच पुणे जिल्हा परिषद निवडणुकांत राष्ट्रवादी काँग्रेसने मिळवलेले हे यश पक्षासाठी महत्त्वाचे मानले जात आहे. आता नव्या सत्ताकारणात जिल्ह्याच्या विकासाला कोणती दिशा दिली जाणार, कोणत्या प्रश्नांना प्राधान्य मिळणार, याकडे पुणेकरांचे लक्ष लागले आहे.

### मुळशी तालुक्यात घवघवीत यश

● मुळशी तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या तीन जागांपैकी दोन जागांवर राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार)ने विजय मिळविला. एका जागेवर भाजपचा उमेदवार विजयी झाला. पंचायत समितीत सहापैकी तीन जागा राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार)ला, तर दोन जागा राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला मिळाल्या. भाजपला एका जागेवर समाधान मानावे लागले.

# अर्थसंकल्पीय चर्चेआधीच लोकसभेचे कामकाज ठप्प

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** लोकसभा सुरळीत चालविण्यासाठी सामंजस्यपूर्ण चर्चा होऊनही सोमवारी सत्ताधारी पक्ष आणि विरोधकांमधील तीव्र वादामुळे सभागृहाचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब करावे लागले. केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ वरील चर्चेला सुरुवात होण्यापूर्वीच वारंवार गोंधळ झाल्याने लोकसभेचे कामकाज ठप्प झाले. यानंतर काँग्रेस खासदार शशी थरूर यांनी केंद्र सरकार आणि लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्यावर संसद चालविण्यात रस नसल्याचा गंभीर आरोप केला.


सभागृहाबाहेर पत्रकारांशी बोलताना थरूर म्हणाले की, ते अर्थसंकल्पीय चर्चेत सहभागी होण्यासाठी पूर्णपणे तयार होते; मात्र लोकसभेत निर्माण झालेल्या गोंधळामुळे त्यांना बोलण्याची संधीच मिळाली नाही.

लोकसभेचे कामकाज सकाळी ११ वाजता सुरू होताच विरोधी पक्षांच्या घोषणाबाजीमुळे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सभागृह १२ वाजेपर्यंत तहकूब केले. दुपारी पुन्हा कामकाज सुरू झाले तरी परिस्थितीत बदल न झाल्याने सभागृह २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले. दुपारी २ वाजता कामकाज सुरू झाल्यावर पीठासीन अधिकारी संध्या राय यांनी चर्चेला सुरुवात करण्यासाठी शशी थरूर यांचे नाव घेतले. मात्र, थरूर यांनी स्पष्ट केले की विरोधी पक्षनेते राहुल गांधी सभागृहात काही मुद्द्यांवर बोलू इच्छित आहेत आणि तो त्यांचा अधिकार आहे.


**(संबंधित वृत्त पान ४ वर)**

## संपादकीय

### जिल्हा परिषद निवडणुका : ग्रामीण लोकशाहीची कसोटी



**महाराष्ट्रातील जिल्हा परिषद निवडणुका म्हणजे केवळ स्थानिक सत्तांतर नव्हे; त्या ग्रामीण समाजाचे प्रश्न, अपेक्षा आणि राजकीय अस्वस्थता यांचा आरसा असतात. अलीकडील निकालांनी राज्यातील लोकशाहीची दिशा, पक्षीय धोरणे आणि विकेंद्रीकरणाचे वास्तव पुन्हा अधोरेखित केले आहे.**

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांकडे नेहमीच दुय्यम नजरेने पाहिले जाते. राज्य व केंद्राच्या राजकारणात रंगलेल्या संघर्षांपुढे या निवडणुका गौण वाटतात. मात्र ग्रामीण महाराष्ट्राच्या दृष्टीने या निवडणुका सर्वांत महत्त्वाच्या असतात, कारण पाणी, रस्ते, आरोग्य, शिक्षण आणि शेती यासारख्या रोजच्या जगण्याशी थेट संबंधित प्रश्नांवर निर्णय घेणारी सत्ता याच पातळीवर कार्यरत असते. त्यामुळे या निकालांचे विश्लेषण करताना फक्त कोण जिंकले आणि कोण हरले यापेक्षा लोकशाहीची प्रकृती कशी आहे, हे तपासणे अधिक महत्त्वाचे ठरते. यंदाच्या जिल्हा परिषद निवडणुकांनी हे स्पष्ट केले की ग्रामीण मतदार अजूनही पूर्णपणे कोणत्याही एका राजकीय प्रवाहात वाहून गेलेला नाही. काही जिल्ह्यांत सत्ताधारी पक्षांना यश मिळाले, तर काही ठिकाणी विरोधकांनी आपली पकड टिकवली. यामधून ग्रामीण समाजाची राजकीय जाणीव एकरेषीय नसून बहुपेडी आहे, हे अधोरेखित होते. विकासाची भाषा, स्थानिक नेतृत्वाची विश्वासार्हता आणि जातीय-सामाजिक समीकरणे यांचा गुंता या निवडणुकांत ठळकपणे दिसतो. महत्त्वाचा मुद्दा म्हणजे या निवडणुकांमधील सहभाग. ग्रामीण भागात तुलनेने चांगले मतदान झाले, याचा अर्थ लोकशाहीवरील विश्वास अजूनही टिकून आहे. मात्र हा सहभाग उत्स्फूर्त आहे की पर्यायांच्या अभावामुळे निर्माण झालेला आहे, हा प्रश्न दुर्लक्षित करता येणार नाही. अनेक ठिकाणी उमेदवारांपेक्षा पक्षांचे लेबल महत्त्वाचे ठरले. स्थानिक स्वराज्य संस्थांची कल्पना ही स्थानिक प्रश्नांवर स्थानिक निर्णय घेण्यासाठी होती; परंतु पक्षीय राजकारणाच्या वाढत्या हस्तक्षेपामुळे ही स्वायत्तता झिजत चालली आहे. जिल्हा परिषदांची आर्थिक अवस्था हा या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवरचा कळीचा मुद्दा आहे. केंद्र आणि राज्य सरकारांकडून निधीवर वाढता नियंत्रण, योजना ठरवताना स्थानिक गरजांऐवजी वरून येणाऱ्या आदेशांचे पालन, आणि निधी वितरणातील विलंब यामुळे जिल्हा परिषदांची भूमिका केवळ अंमलबजावणी यंत्रणापुरती मर्यादित होत आहे. अशा परिस्थितीत निवडून आलेले प्रतिनिधीही प्रभावी निर्णय घेण्यास असमर्थ ठरतात. लोकशाहीची चौकट टिकवून ठेवायची असेल, तर या संस्थांना केवळ राजकीय नव्हे तर आर्थिक स्वायत्तताही द्यावी लागेल. या निवडणुकांतून आणखी एक वास्तव समोर आले आहे, ते म्हणजे ग्रामीण असंतोष. शेतीमालाला योग्य भाव, वाढती उत्पादनखर्च, अपुरी सिंचनव्यवस्था आणि रोजगाराच्या मर्यादित संधी या प्रश्नांवर ठोस उत्तर मिळत नसल्याची भावना मतदारांत आहे. हा असंतोष काही ठिकाणी सत्ताधाऱ्यांच्या विरोधात मतांतून व्यक्त झाला, तर काही ठिकाणी तो पर्यायांच्या अभावामुळे व्यक्तच होऊ शकला नाही. याचा अर्थ ग्रामीण समाज राजकारणाबाबत उदासीन झाला आहे असे नाही; उलट तो अधिक सावध आणि संशयी झाला आहे. महिला आणि सामाजिकदृष्ट्या मागास घटकांचे प्रतिनिधित्व ही जिल्हा परिषदांची आणखी एक महत्त्वाची बाजू आहे. आरक्षणामुळे अनेक नव्या चेहऱ्यांना संधी मिळते, पण सत्तेचा प्रत्यक्ष वापर अनेकदा पडद्यामागील पुरुष नेतृत्वाकडेच राहतो, ही वस्तुस्थिती आहे. लोकशाही केवळ आकड्यांत मोजता येत नाही; ती निर्णय प्रक्रियेत किती समावेशक आहे, यावर तिची गुणवत्ता ठरते. या निवडणुकांनंतरही हा प्रश्न तसाच उभा राहतो. राजकीय पक्षांसाठी हे निकाल आत्मपरीक्षणाची संधी आहेत. जिल्हा परिषदांमध्ये मिळालेला पाठिंबा हा विधानसभेतील विजयाची हमी नसतो. ग्रामीण मतदार स्थानिक पातळीवर वेगळे निर्णय घेतो आणि राज्य किंवा राष्ट्रीय पातळीवर वेगळे. त्यामुळे या निकालांना 'मिनी विधानसभा' ठरवण्याचा मोह टाळायला हवा. त्याऐवजी पक्षांनी स्थानिक नेतृत्व घडवणे, प्रश्नाधारित राजकारण करणे आणि स्वराज्य संस्थांना खऱ्या अर्थाने सक्षम करणे, या दिशेने पावले उचलणे गरजेचे आहे. शेवटी, जिल्हा परिषद निवडणुका लोकशाहीची तळागाळातील चाचणी असतात. या चाचणीत केवळ पक्ष नव्हे, तर संपूर्ण शासनव्यवस्था तपासली जाते. यंदाचे निकाल सांगतात की ग्रामीण महाराष्ट्र अजूनही प्रश्न विचारतो, पर्याय शोधतो आणि प्रसंगी सत्तेला धडा शिकवतो. हीच लोकशाहीची खरी ताकद आहे. ती टिकवायची असेल, तर या निवडणुकांकडे केवळ राजकीय गुणाकार म्हणून नव्हे, तर लोकशाहीच्या आरोग्याचा अहवाल म्हणून पाहावे लागेल.

# सभापती आणि सभागृह : लोकशाहीची घसरती रेषा

लोकसभेतील अलीकडील घडामोडी पाहिल्या, तर त्या सत्ताधारी आणि विरोधकांतील नेहमीच्या राजकीय संघर्षाच्या चौकटीत बसवता येत नाहीत. काँग्रेसच्या महिला खासदारांनी सभापती ओम बिर्ला यांना लिहिलेले पत्र हे केवळ एका वादग्रस्त विधानाचे खंडन नाही, तर संसदेच्या निष्पक्षतेवर आणि सभापतीपदाच्या स्वायत्ततेवर उपस्थित झालेल्या गंभीर प्रश्नांचे दस्तऐवज आहे. सभापतींवर सत्ताधारी पक्षाचा दबाव असल्याचा आरोप संसदेच्या इतिहासात नवा नाही, पण तो थेट आणि लिखित स्वरूपात येणे ही चिंतेची बाब आहे. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावावरील चर्चेला पंतप्रधानांनी उत्तर देणे ही केवळ संसदीय परंपरा नाही, तर लोकशाही उत्तरदायित्वाची किमान अपेक्षा आहे. पंतप्रधान चार दिवस सभागृहात अनुपस्थित राहतात, विरोधी पक्षनेत्याला बोलण्याची संधी दिली जात नाही आणि अखेरीस पंतप्रधानांच्या उत्तराविना आभार प्रस्ताव मंजूर होतो, तेव्हा प्रश्न प्रक्रियेचा नसून वृत्तीचा होतो. संसद ही प्रश्नांना सामोरे जाण्याची जागा असते; टाळण्याची नव्हे. सभापती ओम बिर्ला यांनी केलेला दावा मात्र या सगळ्या प्रकरणाला अधिक गंभीर वळण देतो. काँग्रेसचे काही सदस्य पंतप्रधानांच्या आसनाकडे जाऊन 'काहीतरी अनपेक्षित' करू शकतात, अशी ठोस माहिती असल्याचे त्यांनी सांगितले. हा आरोप केवळ राजकीय नाही, तर संसदीय शिस्तीच्या मुळावर जाणारा आहे. पण अशा दाव्याला पुरावा नसेल, तर तो सभापतींच्या पदालाच अविश्वसनीय ठरवतो. काँग्रेसच्या महिला खासदारांचे पत्र याच ठिकाणी महत्त्वाचे ठरते. पंतप्रधानांच्या अनुपस्थितीचे समर्थन करण्यासाठी आपल्यावर खोटे, निराधार आणि बदनामीकारक आरोप करण्यात आले, असे त्या सांगतात. संसदेतील महिला प्रतिनिधींवर अप्रत्यक्षपणे हिंसक हेतूचा

> » **लोकसभेत जे घडले ते एखाद्या दिवशी उसळलेल्या गदारोळापुरते मर्यादित नाही. सभापतींची भूमिका, पंतप्रधानांची अनुपस्थिती आणि विरोधकांवरील आरोप या सगळ्यांतून संसदीय लोकशाहीची अंतर्गत अवस्था अस्वस्थ करणाऱ्या पातळीवर पोहोचल्याचे स्पष्ट होते.**



संशय टाकला जाणे हे लोकशाहीला शोभणारे नाही. हा प्रश्न केवळ काँग्रेसचा नाही; उद्या कोणत्याही विरोधी पक्षावर असे आरोप होऊ शकतात. सभापतींचे पद हे सत्ताधाऱ्यांचे ढाल बनण्यासाठी नसते. ते सभागृहाचे रक्षणकर्ते असते, हे संविधानाने स्पष्टपणे अपेक्षित केले आहे. सभापतींनी निर्णय घेताना सरकारच्या प्रतिसादाची वाट पाहावी लागते, असे जर उघडपणे सांगितले जाऊ लागले, तर त्या खुर्चीची स्वायत्तता कागदापुरती उरते. संसदेत न्याय मिळावा म्हणून सभापतींकडे पाहिले जाते; सरकारकडे नाही. या सगळ्या चित्रात विरोधकांची भूमिका पूर्णपणे निर्दोष आहे, असेही म्हणता येणार नाही. सातत्याने घोषणाबाजी करणे, सभागृह चालू न देणे, हा लोकशाहीचा सुसंस्कृत मार्ग नाही. पण विरोधाची तीव्रता का वाढते, याचे आत्मपरीक्षण सत्ताधाऱ्यांनी करणे आवश्यक आहे. बोलण्याची संधी नाकारणे, निलंबनाचा वारंवार वापर करणे आणि सत्ताधारी खासदारांच्या आक्षेपार्ह विधानांकडे डोळेझाक करणे, या सगळ्यांमुळे असंतोष वाढतो. पंतप्रधानांच्या अनुपस्थितीसाठी सुरक्षेचे कारण पुढे केले जाणे हेही गंभीर संकेत देते. संसद ही संघर्षाची जागा आहे, पण ती हिंसेची जागा कधीच नव्हती. निवडून आलेल्या प्रतिनिधींवरच अविश्वास दाखवण्याची वेळ येते, तेव्हा लोकशाही व्यवस्थेचा आत्मविश्वास ढासळलेला असतो. काँग्रेसच्या महिला खासदारांनी इतिहासाचा संदर्भ देत सभापतींना इशारा दिला आहे. कठीण काळात योग्य बाजूने उभे राहणारे म्हणून इतिहासात नाव नोंदवले जावे, ही अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे. हा इशारा केवळ भावनिक नाही; तो घटनात्मक आहे. आज जे निर्णय घेतले जातात, ते उद्याच्या संसदीय संकेतांची दिशा ठरवतात.

लोकसभा ही केवळ बहुमताच्या जोरावर चालवायची संस्था नाही. ती प्रश्न विचारण्यासाठी, सरकारला जाब विचारण्यासाठी आणि विरोध ऐकून घेण्यासाठी आहे. पंतप्रधानांचे उत्तर टाळणे, सभापतींच्या भूमिकेवर संशय निर्माण होणे आणि विरोधकांना सातत्याने दडपले जाणे, या सगळ्यांमुळे संसदेची विश्वासार्हता कमी होत चालली आहे. या टप्प्यावर सत्ताधाऱ्यांनी आणि सभापतींनी दोघांनीही थांबून विचार करण्याची गरज आहे. सभागृह हे सत्तेचे प्रदर्शन करण्याचे व्यासपीठ नाही, तर लोकशाहीची कसोटी आहे. ती कसोटी अपयशी ठरली, तर दोष कोण्या एका पक्षाचा नसेल; तो संपूर्ण व्यवस्थेचा असेल.

## शहरातील आठही क्षेत्रीय कार्यालयांअंतर्गत व्यापक अतिक्रमण विरोधी कारवाई

### निवडणूक कालावधीत १४३ अनाधिकृत बांधकामे हटवली; हजारो फ्लेक्स, साहित्य जप्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी चिंचवड :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या कालावधीत शहरातील आठही क्षेत्रीय कार्यालयांमार्फत व्यापक अतिक्रमण विरोधी कारवाई करण्यात आली.

या कालावधीत एकूण १४३ अनाधिकृत बांधकामे हटविण्यात आली असून १ हजार २६० फ्लेक्स, १३ हजार ९७ केऑक्स, ११५ हातगाड्या, ६० टपऱ्या तसेच २ हजार ९९५ टेबल, वजन काटे, खुर्च्या, बाकडे, झेंडे व इतर साहित्य जप्त करण्यात आल्याची माहिती अतिक्रमण विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील यांनी दिली. आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली व अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या नियंत्रणाखाली ही कारवाई राबविण्यात आली.





अतिक्रमण निरीक्षक, बीट निरीक्षक, महाराष्ट्र राज्य सुरक्षा दलाचे जवान आणि पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त पथकांनी विविध भागात मोहीम राबवून रस्ते, पदपथ व सार्वजनिक जागांवरील अतिक्रमणे हटवली.

क्षेत्रीय कार्यालयनिहाय कारवाईत 'अ' क्षेत्रीय कार्यालयात १३ अनाधिकृत बांधकामे हटवून ४८ फ्लेक्स, ३,१२१ केऑक्स, ३७ हातगाड्या व ४५२ विविध साहित्य जप्त करण्यात आले. 'ब' क्षेत्रीय कार्यालयात २९ बांधकामांवर कारवाई करून ५५७ फ्लेक्स व ३,००५ केऑक्स हटविण्यात आले. 'क' क्षेत्रीय कार्यालयात २ बांधकामे, २७० फ्लेक्स, १,९३९ केऑक्स व १३ टपऱ्यांवर कारवाई झाली, तर 'ड' क्षेत्रीय कार्यालयात बांधकाम आढळले नसले तरी ९६ फ्लेक्स व १,२१५ केऑक्स हटविण्यात आले.

## महिला सक्षमीकरणासाठी आ. अमित गोरखे यांचा पुढाकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** महिला सक्षमीकरण हा केवळ शब्द नसून तो कृतीचा विषय आहे. महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम झाली तर कुटुंब आणि समाजही प्रगतीपथावर जातो, असा विश्वास भाजपचे आमदार अमित गणपत गोरखे यांनी व्यक्त केला. त्यांच्या संकल्पनेतून प्रभाग क्रमांक १० मध्ये आयोजित 'मोफत शिलाई मशीन प्रशिक्षण व किट वाटप' सोहळा ७ फेब्रुवारी रोजी उत्साहात पार पडला. या उपक्रमांतर्गत ४०० गरजू महिलांना प्रशिक्षणानंतर प्रत्यक्ष शिलाई मशीन किटचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त करत उपस्थितांनी दोन मिनिटे मौन पाळून श्रद्धांजली अर्पण केली. तसेच माता रमाबाई आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून त्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. ४०० महिलांना स्वावलंबनाचे साधन उपलब्ध होणे हीच माता रमाईंच्या विचारांना खरी मानवंदना असल्याचे मान्यवरांनी सांगितले. "महिलांनी जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर पुढे यावे. त्यांच्या हाताला काम मिळावे आणि हक्काचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे, ही आमची जबाबदारी आहे. महिलांच्या कौशल्याला वाव मिळून त्यांचे कुटुंब आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे, हा मुख्य उद्देश आहे," असे आमदार गोरखे यांनी स्पष्ट केले. पुढेही महिलांच्या रोजगारासाठी विविध शासकीय योजना व वैयक्तिक स्तरावर सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. या प्रसंगी नगरसेविका अनुराधाताई गोरखे, सुप्रियाताई चांदगुडे व माजी नगरसेविका जयश्रीताई वाघमारे उपस्थित होत्या. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिलांनी मनोगत व्यक्त करत "या उपक्रमामुळे सन्मानाने जगण्याचे साधन मिळाले," अशी भावना व्यक्त केली.

## राष्ट्रीय नानचाकू स्पर्धेत महाराष्ट्र तिसरा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**+ कानपूर येथे ३०० खेळाडूंच्या सहभागात राज्याच्या संघाची उल्लेखनीय कामगिरी**

**पिंपरी :** उत्तर प्रदेशातील कानपूर येथे पार पडलेल्या राष्ट्रीय नानचाकू स्पर्धा व पंच सेमिनारमध्ये महाराष्ट्राच्या खेळाडूंनी एकत्रित कामगिरीच्या जोरावर तिसरा क्रमांक पटकावला. देशभरातून सुमारे ३०० खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. शिस्त, तांत्रिक कौशल्य आणि संघभावनेच्या बळावर महाराष्ट्राच्या संघाने पदकतालिकेत मानाचे स्थान मिळवले.

महाराष्ट्रातील खेळाडूंनी फ्री-स्टाइल, काथा आणि कुमिते या प्रकारांत चमकदार प्रदर्शन करत अनेक पदके जिंकली. एकांतिका रेड्डी, स्वरा हवळने, स्वरूप एकावडे, अयान शेख, स्वरूपा नामदे, आरुष मोरे, खुशी गुप्ता, अनन्या माने, तृप्ती वाडकर, जिक्रा खान, ओवी मालुसरे, आराध्या मालुसरे, सोहम मालुसरे, युवराज मालुसरे, शिवराज मालुसरे आणि आर्यन जोरवर यांनी आपापल्या गटात उल्लेखनीय यश संपादन केले.

स्पर्धेदरम्यान पंच सेमिनारमध्ये दीपक शिर्के, स्वरूप एकवाडे, अनिल शिंदे, विजय कांबळे, रिदम तिवारी, स्वरा जाधव आणि अक्सा मुल्ला यांनी पंच परीक्षा यशस्वीरित्या पूर्ण केली. महाराष्ट्र नानचाकू संघाचे महासचिव दीपक शिर्के यांचे मार्गदर्शन खेळाडूंना लाभले.

नानचाकू असोसिएशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष डॉ. रोहित सक्सेना, अध्यक्ष संजय कपूर आणि महासचिव बाबूल वर्मा यांनी महाराष्ट्राच्या संघाचे विशेष अभिनंदन केले.

## शुभेच्छांसाठी हार नको, विद्यार्थ्यांसाठी वही-पेन द्या!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**+ महापौर रवी लांडगे यांचे सामाजिक जाणीव जपणारे नागरिकांना आवाहन**

**पिंपरी :** महापौर पदाच्या शुभेच्छा देताना हार, पुष्पगुच्छ किंवा अन्य औपचारिक भेटवस्तू आणू नयेत. त्याऐवजी महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरेल असे शालेय साहित्य—पुस्तके, वह्या, पेन, पेन्सिल तसेच इतर शैक्षणिक वस्तू आणाव्यात, असे आवाहन पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवी लांडगे यांनी नागरिकांना केले आहे.

महापौर रवी लांडगे हे नुकतेच वरिष्ठ नेत्यांच्या भेटी व दौऱ्यांमध्ये व्यस्त असल्याने काही दिवस शहरातील नागरिकांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊ शकले नाहीत. याबद्दल त्यांनी नागरिकांची दिलगिरी व्यक्त केली. मात्र, शुभेच्छा स्वीकारताना समाजोपयोगी उपक्रमाला प्राधान्य देण्याचा आपला ठाम निर्णय त्यांनी यावेळी स्पष्ट केला.

हार-पुष्पगुच्छ हे क्षणिक सन्मानाचे प्रतीक असते; मात्र विद्यार्थ्यांना दिलेले शैक्षणिक साहित्य त्यांच्या शिक्षणासाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी मोलाचे ठरते, असे महापौर लांडगे यांनी सांगितले. या उपक्रमाच्या माध्यमातून महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना थेट शैक्षणिक मदत मिळणार असून, शिक्षणासाठी आवश्यक असलेल्या मूलभूत साधनांची पूर्तता होण्यास हातभार लागणार आहे.




औपचारिक शुभेच्छांपेक्षा विद्यार्थ्यांच्या शिक्षणात गुंतवणूक करण्याचा हा सकारात्मक आणि सामाजिकदृष्ट्या उपयुक्त संदेश असून, यामुळे समाजात शिक्षणाबाबत संवेदनशीलता आणि जबाबदारीची भावना वाढीस लागेल, असेही त्यांनी नमूद केले.

महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक बळ वाढावे, त्यांना वेळेवर आवश्यक साहित्य मिळावे आणि शिक्षणाकडे समाजाचा दृष्टिकोन अधिक सकारात्मक व्हावा, या उद्देशाने हे आवाहन करण्यात आले आहे. नागरिकांनी सामाजिक बांधिलकी जपत या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा, असे आवाहनही महापौर रवी लांडगे यांनी केले आहे.

## आयटी क्षेत्रातून पुण्याच्या पहिल्या नागरिकपदी मंजुषा नागपुरे!

### भाजपकडून महापौरपदाची धुरा; तांत्रिक पार्श्वभूमी असलेल्या नागपुरेंकडून शहराच्या विकासासाठी डिजिटल दृष्टीकोनाची अपेक्षा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** भारतीय जनता पक्षाच्या मंजुषा नागपुरे यांनी पुणे महानगरपालिकेच्या महापौरपदाची धुरा स्वीकारत शहराच्या पहिल्या नागरिक म्हणून जबाबदारी हाती घेतली आहे. आयटी क्षेत्रातील अनुभव असलेल्या नागपुरे यांच्या निवडीमुळे प्रशासनात तंत्रज्ञानाधिष्ठित कामकाजाला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.




मंजुषा नागपुरे या व्यावसायिक आयटी पार्श्वभूमी असलेल्या नेत्या म्हणून ओळखल्या जातात. नगरसेवक म्हणून काम करताना त्यांनी स्थानिक पातळीवरील विकासकामांवर लक्ष केंद्रित केले होते. शहरातील पायाभूत सुविधा, स्वच्छता, डिजिटल सेवा आणि नागरिकाभिमुख प्रशासन या विषयांवर त्यांनी सातत्याने भूमिका मांडली आहे. त्यांच्या कार्यपद्धतीत व्यवस्थापन कौशल्य आणि तंत्रज्ञानाचा वापर यांना प्राधान्य असल्याचे पक्षातील नेत्यांनी नमूद केले आहे. महापौरपद स्वीकारल्यानंतर नागपुरे यांनी पुण्याच्या सर्वांगीण विकासाला गती देण्याचा निर्धार व्यक्त केला. शहरातील वाहतूक, पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन आणि स्मार्ट सिटी उपक्रमांना अधिक प्रभावीपणे पुढे नेण्यावर भर देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. तसेच नागरिकांना जलद आणि पारदर्शक सेवा देण्यासाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा अधिक वापर करण्याची भूमिका त्यांनी स्पष्ट केली. पुणे हे शिक्षण, उद्योग आणि आयटी क्षेत्राचे महत्त्वाचे केंद्र असल्याने शहराच्या वाढत्या गरजांनुसार प्रशासनात नाविन्यपूर्ण उपाययोजना राबवण्याची आवश्यकता असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. नागरिकांचा सहभाग वाढवून स्थानिक समस्यांचे त्वरित निराकरण करणे, तसेच पायाभूत सुविधा प्रकल्पांना वेळेत पूर्ण करणे, हे आगामी काळातील प्रमुख उद्दिष्ट असल्याचे त्यांनी नमूद केले.

राजकीय वर्तुळात नागपुरे यांच्या निवडीला विशेष महत्त्व दिले जात आहे. आयटी क्षेत्रातील अनुभव असलेली व्यक्ती महापौरपदी आल्याने प्रशासनात आधुनिक व्यवस्थापन पद्धतींचा वापर वाढेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. शहराच्या विकासासाठी सर्व पक्षांचा समन्वय साधत नागरिककेंद्रित निर्णय घेण्यावर त्यांनी भर दिला आहे. नागपुरे यांच्या नेतृत्वाखाली पुणे महानगरपालिकेचे कामकाज अधिक परिणामकारक व तंत्रज्ञानाधिष्ठित होईल, अशी आशा व्यक्त केली जात असून, आगामी काळात शहराच्या विकासकामांना नवी दिशा मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## महापालिकेचे टेंडर देण्याचे आमिष; तरुणाची ११.६१ लाखांची फसवणूक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**+ बनावट पत्र देऊन विश्वासघात; भोसरी पोलिसांकडून गुन्हा दाखल**

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेचे झाडे लावण्याचे टेंडर मिळवून देण्याचे आमिष दाखवत एका तरुणाची ११ लाख ६१ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. ही घटना २० एप्रिल २०२४ ते १४ सप्टेंबर २०२४ दरम्यान भोसरीतील लांडगे आळी येथे घडली.

या प्रकरणी संदेश नंदकुमार लांडगे (वय ३२, रा. साई निवास, लांडगे आळी, भोसरी) यांनी भोसरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून, अभिजित संतोष गायकवाड (रा. दिघी रोड, भोसरी) याच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने फिर्यादीचा विश्वास संपादन करून महापालिकेचे टेंडर मिळवून देण्यासाठी वेळोवेळी एकूण १७ लाख ४९ हजार रुपये घेतले. मात्र प्रत्यक्षात टेंडर मिळाले नसताना आरोपीने बनावट पत्राची प्रत देऊन टेंडर मंजूर झाल्याचे खोटे सांगितले. त्यानंतर केवळ ५ लाख ८८ हजार रुपये परत करून उर्वरित ११ लाख ६१ हजार रुपये अपहार केल्याचे समोर आले.

फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर फिर्यादीने पोलिसांकडे धाव घेतली. भोसरी पोलिसांनी संबंधित आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### लोणी काळभोर गटात राष्ट्रवादीचा दणदणीत विजय;

**पिंपळवंडी :** लोणी काळभोर जिल्हा परिषद गटात राष्ट्रवादी काँग्रेसचा विजय निश्चित करत कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रशांत काळभोर 'किंगमेकर' ठरले. भाजपने जोरदार प्रचार करूनही अपेक्षित यश मिळवू शकले नाही. राष्ट्रवादीच्या शीतल कांबळे यांनी 15,529 मते मिळवत 4,810 मतांनी विजय मिळवला, तर कदमवाकवस्ती गणात अमोल टेकाळे यांनी 6,892 मते मिळवत 220 मतांच्या फरकाने बाजी मारली. प्रशांत काळभोर यांच्या नियोजन, थेट जनसंपर्क आणि अचूक रणनीतीमुळे गटात राष्ट्रवादीचा झेंडा पुन्हा फडकला, अशी प्रतिक्रिया कार्यकर्त्यांकडून व्यक्त होत आहे.

### राजगड तालुक्यात राष्ट्रवादीचे वर्चस्व कायम

**राजगड :** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांत राष्ट्रवादी काँग्रेसने ठोस कामगिरी करत तालुक्यात पुन्हा सत्ता मजबूत केली. वेल्हे गटात तानाजी मांगडे यांनी 10,262 मते घेत 797 मतांनी विजय मिळवला, तर विंझर गटात अमोल नलावडे विजयी झाले. पंचायत समितीत वेल्हे, वांगणी व पानशेत या तीन गणांत राष्ट्रवादीचे उमेदवार जिंकले, तर विंझर गणात भाजपचा एकमेव विजय झाला. संघटनात्मक ताकद व स्थानिक विकासकामांच्या बळावर मतदारांनी राष्ट्रवादीला पसंती दिल्याचे चित्र स्पष्ट झाले.

### रिलमध्ये 'हिट', निवडणुकीत 'फ्लॉप'!

**पुणे :** शिरूर तालुक्यातील कारेगाव पंचायत समिती निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार निर्मला नवले यांना भाजपच्या मनीषा पाचंगे यांनी सुमारे 300 मतांनी पराभूत केले. सोशल मीडियावर 5.74 लाखांहून अधिक इन्स्टाग्राम फॉलोअर्स असलेल्या नवले या माजी सरपंच व आयटी अभियंता आहेत.

## आंबेगाव तालुका जि.प.-पं.स. निवडणूक

# राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्चस्व कायम!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर :** आंबेगाव तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचा निकाल मंगळवार दि. ९ रोजी जाहीर झाला. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध करत ५ पैकी ३ जिल्हा परिषद जागा जिंकल्या, तर शिवसेना (शिंदे) व राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाला प्रत्येकी एक जागा मिळाली. पंचायत समिती निवडणुकीतही राष्ट्रवादी काँग्रेसचे आठ, तर राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे दोन उमेदवार विजयी झाले.

पारगाव-जारकरवाडी जिल्हा परिषद गटातून राष्ट्रवादी काँग्रेसचे विवेक वळसे पाटील २,८०७ मतांनी विजयी झाले. त्यांना १३,८०९ मते मिळाली, तर शिवसेना (शिंदे)चे अरुण गिरे यांना ११,००२ मते मिळाली. अवसरी बुद्रुक गटातून विष्णू काका हिंगे यांनी १०,८७८ मते मिळवत ६०५ मतांनी विजय मिळवला. त्यांच्या विरोधात राष्ट्रवादी (शरद पवार)चे प्रशांत अभंग यांना १०,२७३ मते मिळाली.

शिनोली गटातून शिला राजेंद्र लोहकरे यांनी १०,३६७ मते घेत ३,६४२ मतांनी विजय संपादन केला. त्यांच्या विरोधातील राष्ट्रवादी (शरद पवार)च्या सरिता माळी यांना ६,७२५ मते मिळाली. घोडेगाव गटात शिवसेना (शिंदे)च्या सुवर्णा दरेकर ११,६७४ मतांसह ३०६ मतांनी विजयी झाल्या. कळंब गटात राष्ट्रवादी (शरद पवार)च्या प्रीती थोरात यांनी १४,१११ मते मिळवत १,५६१ मतांनी विजय मिळवला. पंचायत समिती गणांमध्ये शिनोली येथे राष्ट्रवादी काँग्रेसच्या ज्योती पारधी २,१४७ मतांनी विजयी झाल्या. बोरघर गणात राष्ट्रवादीचे संजय गवारी १,७४५ मताधिक्याने निवडून आले, तर पेठ गणात संजय पवळे १,५९५ मतांनी विजयी झाले. घोडेगाव गणात कैलास काळे १,८५३ मतांनी विजयी झाले.

कळंब गणात राष्ट्रवादी काँग्रेसच्या उषा कानडे ३,०५४ मतांनी विजयी झाल्या. चांडोली गणात राष्ट्रवादी (शरद पवार)च्या प्रियांका वाघ १,४१२ मतांनी निवडून आल्या. जारकरवाडी गणात राष्ट्रवादीच्या अंकिता वाळुंज ५४८ मतांनी विजयी झाल्या. पारगाव तर्फे अवसरी बुद्रुक गणात राष्ट्रवादी (शरद पवार)च्या श्वेता ढोबळे ५४२ मतांनी निवडून आल्या.

अवसरी बुद्रुक गणात राष्ट्रवादीचे निलेश टेमकर २,५७७ मताधिक्याने विजयी झाले, तर पिंपळगाव तर्फे महाळुंगे गणात राष्ट्रवादीचे शिवाजी निघोट ४५६ मतांनी निवडून आले. या निवडणुकीत काही गटांमध्ये चुरशीचे सामने पाहायला मिळाले. राज्यातील वरिष्ठ नेत्यांच्या प्रचारसभांनंतरही काही ठिकाणी अनपेक्षित निकाल लागले. एकूणच, आंबेगाव तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसने संघटनबळ आणि स्थानिक पातळीवरील प्रभाव कायम ठेवत बहुमताचा कौल मिळवला, अशी राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे.

## वळती येथे माता रमाई आंबेडकर जयंती उत्साहात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

बौद्ध विकास तरुण मित्र मंडळाचा पुढाकार; महिलांचा हळदी-कुंकू कार्यक्रम

**पारगाव :** वळती (ता. आंबेगाव) येथील बौद्ध विकास तरुण मित्र मंडळाच्या वतीने माता रमाई आंबेडकर जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. या प्रसंगी महिलांसाठी विशेष हळदी-कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास गावातील महिला, युवक आणि मंडळाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने करण्यात आली. यावेळी माता रमाई आंबेडकर यांनी समाजउन्नतीसाठी केलेल्या त्यागमय कार्याचा आढावा मान्यवरांनी घेतला. महिलांमध्ये सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक जाणीव निर्माण व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. हळदी-कुंकू कार्यक्रमामुळे महिलांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून माता रमाई आंबेडकर यांचे प्रेरणादायी जीवन, त्याग, सहनशीलता आणि सामाजिक बांधिलकी यावर प्रकाश टाकला. महिलांनी शिक्षण, संघटन आणि स्वावलंबनाच्या मार्गावर ठामपणे वाटचाल करावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

या कार्यक्रमास बौद्ध विकास तरुण मित्र मंडळाचे अध्यक्ष राजू शेवाळे यांच्यासह संदीप मिरके, संदीप खुडे, सुदाम शेवाळे, कमलेश शेवाळे, गणेश भालेराव, वामन वाव्हळ तसेच मंडळाचे इतर सभासद आणि महिला मंडळातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन शिस्तबद्ध, सुसंस्कृत आणि सामाजिक जाणीवेतून करण्यात आल्याने उपस्थितांनी बौद्ध विकास तरुण मित्र मंडळाच्या कार्याचे विशेष कौतुक केले. अशा उपक्रमांमुळे सामाजिक ऐक्य मजबूत होते आणि महिलांमध्ये आत्मविश्वास वाढतो, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## आंबेगाव तालुक्यात बोरवेलच्या गाड्यांची वर्दळ वाढली; उन्हाळ्याची चाहूल लागताच पाणीटंचाईची भीती

### शेतकरी नव्या बोअरकडे वळले

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव :** आंबेगाव तालुक्यात सध्या उन्हाचा चटका वाढू लागला असून त्याचा थेट परिणाम शेती आणि पाणीपुरवठ्यावर दिसून येत आहे. उन्हाळ्याची चाहूल लागताच तालुक्यातील अनेक गावांमध्ये बोरवेल खोदकामाच्या गाड्या फिरू लागल्या आहेत. संभाव्य पाणीटंचाई टाळण्यासाठी शेतकरी सुरुवातीपासूनच पर्यायी जलस्रोत उभारण्याचा प्रयत्न करत आहेत.

दरवर्षी उन्हाळ्यात या भागात विहिरी, तलाव आणि ओढ्यांची पाणीपातळी झपाट्याने खालावत असल्याने शेतीसाठी पाण्याची टंचाई तीव्र होते. यंदाही अशीच परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे अनेक शेतकरी शेतजमिनींमध्ये नवीन बोअर घेण्याकडे वळले असून काही ठिकाणी आधीचे बोअर कोरडे पडल्याने पुन्हा अधिक खोलवर खोदकाम केले जात आहे.

सध्या तालुक्याच्या पूर्व भागात बोरवेलच्या गाड्या मोठ्या प्रमाणावर फिरताना दिसत आहेत. मात्र या प्रक्रियेमुळे शेतकऱ्यांवर मोठा आर्थिक बोजा पडत आहे. बोअरवेल खोदण्यासाठी मोठा खर्च करावा लागत असून खर्च करूनही पाणी लागेलच याची खात्री नसल्याने शेतकरी संभ्रमात आहेत.

पाणी न मिळाल्यास उभ्या पिकांवर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. विशेषतः भाजीपाला, ऊस आणि फळबागांसारखी पाण्यावर अवलंबून असलेली पिके धोक्यात येण्याची शक्यता आहे. त्यामुळे पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना आणि जलसंधारणाच्या कामांना गती देण्याची मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# मेंगडेवाडीत दिवसा बिबट्याचे दर्शन; शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण

### वन विभागाचा पिंजरा लावूनही बिबट्या जेरबंद नाही; ग्रामस्थांची तात्काळ कारवाईची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर :** आंबेगाव तालुक्यातील मेंगडेवाडी येथील रणपिसे वस्ती जवळ माजी सरपंच भरत फल्ले यांच्या शेतात सोमवारी सकाळी सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास बिबट्या फिरताना दिसून आल्याने परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. दोन दिवसांपूर्वी याच ठिकाणी बिबट्याचे ठसे आढळून आल्याने शेतकरी सतर्क झाले होते.

शेतकऱ्यांच्या मागणीनुसार वन विभागाने शनिवार, दि. ७ रोजी संबंधित ठिकाणी बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरा लावला होता. पिंजऱ्यात भक्ष ठेवण्यात आले असतानाही बिबट्या अद्याप जेरबंद झालेला नाही. आज सकाळी भरत फल्ले शेतात फेरफटका मारण्यासाठी गेले असता पिंजऱ्याच्या आजूबाजूला बिबट्या फिरताना दिसल्याचे त्यांनी सांगितले. दिवसा बिबट्याचे दर्शन झाल्याने शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये चिंता वाढली आहे.

स्थानिक नागरिकांनी वन विभागाला तात्काळ प्रभावी उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. बिबट्याच्या हालचालींमुळे शेतात काम करणाऱ्या मजूर आणि शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. परिसरातील शेतकऱ्यांनी सकाळ-संध्याकाळ शेतात जाणे टाळण्याचा निर्णय घेतला असून लहान मुलांना एकटे बाहेर न सोडण्याबाबत ग्रामस्थ एकमेकांना सूचना देत आहेत. वन विभागाकडून पिंजऱ्याच्या परिसरावर लक्ष ठेवले जात असून बिबट्याला सुरक्षितरीत्या जेरबंद करण्यासाठी आवश्यक उपाययोजना सुरू असल्याची माहिती मिळाली आहे. दरम्यान, ग्रामस्थांनी वन विभागाने गस्त वाढवून बिबट्याचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी केली आहे. दिवसा बिबट्याने दर्शन दिल्याने मेंगडेवाडी परिसरात भीतीचे वातावरण अधिकच तीव्र झाले असून नागरिकांनी सावधगिरी बाळगण्याचे आवाहन करण्यात येत आहे. प्रशासनाने त्वरीत कारवाई करून नागरिकांचा जीवितास धोका टाळावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## जुन्नरमध्ये राष्ट्रवादीला आघाडी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

जि.प.च्या ८ पैकी ४ जागा राष्ट्रवादीकडे, शिवसेनेला ३ तर ठाकरे गटाला १; पं.स.मध्येही चुरशीची लढत

**आळेफाटा :** जुन्नर तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसने सर्वाधिक चार जागा जिंकत आघाडी घेतली. शिवसेनेला तीन जागा, तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला एक जागा मिळाली. राष्ट्रवादी, ठाकरे गट व आरपीआय यांच्या महाआघाडीला एकूण पाच जागा मिळाल्याने तालुक्यातील राजकीय समीकरणे बदलली आहेत.

लेण्याद्री येथे सोमवारी सकाळी मतमोजणी सुरू झाली. निकालानंतर आमदार शरद सोनवणे यांना 'काही खुशी, काही गम' असा अनुभव आला. पंचायत समितीत राष्ट्रवादीचे सहा सदस्य विजयी झाले, तर भाजप व ठाकरे गटाला प्रत्येकी एक जागा मिळाली. शिवसेनेला पं.स.मध्ये आठ जागा मिळाल्याने सभापतीपदासाठी त्यांना केवळ एका मताची गरज आहे.

या निवडणुकीत चार वेळा विजयी झालेल्या ज्येष्ठ नेत्या आशाताई बुचके यांचा पराभव लक्षवेधी ठरला. तसेच बाजार समितीचे विद्यमान संचालक संतोष चव्हाण, प्रियंका शेळके व माजी सदस्य स्नेहल शेळके यांनाही पराभवाचा सामना करावा लागला. दुसरीकडे, बारव-तांबे गटातून राष्ट्रवादीच्या मोनाली (माई) लांडे यांनी विजय मिळवत आदिवासी भागातील पाठिंबा कायम असल्याचे दाखवून दिले.

मतमोजणीदरम्यान कडक पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. विजयी उमेदवारांची घोषणा होताच कार्यकर्त्यांनी जल्लोष केला.

# आंबेगाव तालुक्यात कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत

### कमी बाजारभावामुळे डोळ्यांत पाणी; अवकाळी पाऊस व दरघसरणीचा दुहेरी फटका

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील कांदा उत्पादक शेतकरी सध्या गंभीर आर्थिक संकटात सापडले आहेत. गतवर्षीच्या हंगामातील बराकींमध्ये साठवून ठेवलेल्या कांद्याला अपेक्षित बाजारभाव मिळाला नसल्याने उत्पादन खर्चही निघू शकलेला नाही. अशातच यंदाच्या हंगामातील कांदा काढणीला सुरुवात झाल्याने शेतकऱ्यांची चिंता आणखी वाढली आहे.

सध्या बाजारात कांद्याची मोठ्या प्रमाणावर आवक होत असल्यामुळे दरात सातत्याने घसरण होत आहे. परिणामी, शेतकऱ्यांना मिळेल त्या भावात कांदा विक्री करण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात कांदा हे प्रमुख नगदी पीक मानले जाते; मात्र यंदा अवकाळी पाऊस आणि वातावरणातील बदल यामुळे बराकींमध्ये साठवलेले निम्म्याहून अधिक कांदे सडून गेले आहेत.

काही ठिकाणी बराकींमधील कांदे पूर्णपणे खराब झाल्याचे चित्र दिसत असून मेहनतीने पिकवलेले उत्पादन हातातून निसटत असल्याने शेतकऱ्यांच्या डोळ्यांत पाणी आले आहे. उत्पादन खर्च, मजुरी, खत-बियाणे आणि वाहतूक खर्च वाढले असताना मिळणारे बाजारभाव अत्यंत कमी असल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले आहे, असे पारगाव येथील शेतकरी सुभाष खंडू ढोबळे यांनी सांगितले.

"कांदा हे नगदी पीक असले तरी सलग दुसऱ्या वर्षीही योग्य दर न मिळाल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे," अशी भावना अनेक शेतकऱ्यांनी व्यक्त केली. शासनाने कांद्याला हमीभाव द्यावा, साठवणूक व्यवस्था मजबूत करावी तसेच बाजारातील दर स्थिर ठेवण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शेतकरी वर्गातून जोर धरत आहे.

## भिगवण-शेटफळगडे गटात राष्ट्रवादीचे तीनही उमेदवार विजयी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

अजित पवारांच्या निधनाच्या पार्श्वभूमीवर जल्लोषावर प्रश्नचिन्ह; वीरधवल जगदाळे यांनी संयम राखत विजय श्रद्धांजली म्हणून समर्पित

**चाकण :** भिगवण-शेटफळगडे जिल्हा परिषद गटात झालेल्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या तिन्ही उमेदवारांनी मोठ्या मताधिक्याने विजय मिळवत राजकीय वर्तुळात आपली ताकद सिद्ध केली आहे. जिल्हा परिषद सदस्यपदी मेघना बंडगर यांनी सुमारे १५ हजार मतांच्या फरकाने दणदणीत विजय संपादन केला. भिगवण पंचायत समिती गणातून हेमा माडगे यांनी ९ हजारांहून अधिक मतांनी आघाडी घेत विजय मिळवला, तर शेटफळगडे पंचायत समिती गणातून जितेंद्र वणवे यांनी सुमारे १००० मतांच्या फरकाने विजय मिळवत राष्ट्रवादीचा तिहेरी विजय निश्चित केला. या निवडणुकीत भाजपच्या तिन्ही उमेदवारांचा पराभव झाला.

निकाल जाहीर होताच भिगवण परिसरात राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी उत्साहात विजय जल्लोष साजरा केला. कार्यकर्त्यांनी बाईक रॅली काढत फटाक्यांची आतषबाजी केली तसेच गुलालाची उधळण करत विजयाचा आनंद व्यक्त केला. मात्र, या जल्लोषावरून स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र प्रतिक्रिया उमटताना दिसत आहेत.

नुकत्याच घडलेल्या विमान अपघातात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यभर शोककळा पसरलेली असताना अशा प्रकारे मोठ्या जल्लोषाचे आयोजन करणे योग्य होते का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. अनेकांनी सोशल मीडियावर तसेच स्थानिक पातळीवर नाराजी व्यक्त करत, खऱ्या अर्थाने श्रद्धांजली द्यायची असेल तर संयम पाळणे अपेक्षित होते, अशी भूमिका मांडली.

"अजित पवार यांच्या निधनाचे दुःख खरेच मनापासून झाले असते, तर फटाके, गुलाल आणि रॅली टाळून शांतपणे विजय स्वीकारला असता," अशी प्रतिक्रिया अनेक नागरिकांनी दिली. या पार्श्वभूमीवर विजय साजरा करण्याच्या पद्धतीबाबत राजकीय वर्तुळातही चर्चा रंगू लागली आहे.

दरम्यान, दौंड तालुक्यातून निवडून आलेले वीरधवल जगदाळे यांनी मात्र वेगळी भूमिका घेत कोणताही जल्लोष न करता आपला विजय स्वर्गीय अजित पवार यांना समर्पित केला. निकालानंतर त्यांनी फटाके, गुलाल किंवा रॅली टाळून संयम राखला. विजयाची घोषणा होताच त्यांनी भावूक होत श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्या या भूमिकेचे नागरिक व विविध स्तरांतून कौतुक होत आहे. एकीकडे विजयाचा आनंद आणि दुसरीकडे राज्यातील शोकाची भावना—या दोन्ही गोष्टींचा समतोल राखणे आवश्यक असल्याची अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत. भिगवणमधील जल्लोषाच्या घटनेमुळे राजकीय कार्यकर्त्यांनी सामाजिक संवेदनशीलता जपावी, असा संदेशही पुढे येत आहे. त्यामुळे या विजय जल्लोषावरून स्थानिक तसेच राजकीय पातळीवर चर्चेला अधिक उधाण आले असून आगामी काळात अशा प्रसंगी संयम पाळण्याची गरज अधोरेखित होत आहे.

### राष्ट्रवादी आघाडीवर, शिवसेनेचे बळ कायम;शिंदे गटाला पंचायत समितीत बहुमताजवळची मजल; उद्धव ठाकरे गटाने प्रतिकूल परिस्थितीत अस्तित्व राखले

# जुन्नर तालुक्यात जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणुकीत तिरंगी लढतीचा रंग

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**जुन्नर :** जुन्नर तालुक्यातील जिल्हा परिषदेचे ८ गट व पंचायत समितीच्या १६ गणांसाठी झालेल्या निवडणुकांनी तालुक्यातील राजकीय समीकरणे अधिक स्पष्ट केली आहेत. जिल्हा परिषद गटांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसने ४ जागा जिंकत आघाडी घेतली, तर शिवसेना शिंदे गटाने ३ आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने १ जागा मिळवत आपली उपस्थिती ठळकपणे नोंदवली. पंचायत समिती गणांमध्ये शिवसेना शिंदे गटाने ८ जागा जिंकत सर्वाधिक यश संपादन केले, तर राष्ट्रवादीने ६, शिवसेना उद्धव ठाकरे गटाने १ आणि भाजपने १ जागेवर विजय मिळविला.

तालुक्यात शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे तालुकाप्रमुख माऊली खंडागळे व उपतालुकाप्रमुख मंगेश अण्णा काकडे यांनी शिंदे गटात प्रवेश केल्याने उद्धव गटासमोर मोठे आव्हान उभे राहिले होते. मात्र, अशा प्रतिकूल परिस्थितीत गुलाब विठ्ठल पारखे यांनी सावरगाव-कुसुर गटातून जिल्हा परिषदेत विजय मिळवत पक्षाचे अस्तित्व कायम ठेवले. त्यांच्या विजयामुळे पंचायत समिती कुसुर गणामध्ये जितेंद्र (अमित) ढोले यांचा विजयही सुकर झाला.

**जि.प. गटांतील विजयी उमेदवार**

डिंगोरे-उदापूर गटातून सोनाबाई तुकाराम दाभाडे (राष्ट्रवादी), ओतूर-धालेवाडी तर्फे हवेली गटातून छाया अतुल तांबे (राष्ट्रवादी), आळे-पिंपळवंडी गटातून मंगेश गुलाबराव काकडे (शिवसेना शिंदे), बेल्हे-राजुरी गटातून स्मिता पंकज कनसे (शिवसेना शिंदे), बोरी बुद्रुक-खोडद गटातून कल्पना वैभव कुमार काळे (राष्ट्रवादी), नारायणगाव-वारूळवाडी गटातून स्नेहा (नेहा) बाबू पाटे (शिवसेना शिंदे), सावरगाव-कुसुर गटातून गुलाब विठ्ठल पारखे (शिवसेना उद्धव ठाकरे) आणि बारव-तांबे गटातून मोनाली (माई) अमोल लांडे (राष्ट्रवादी) विजयी ठरले.

**तालुक्यातील राजकारणाला नवी दिशा**

● भाजपच्या ज्येष्ठ नेत्या आशाताई बुचके यांना पराभव स्वीकारावा लागला. शिवसेना उद्धव ठाकरे गटातून शिंदे गटात प्रवेश केलेले माऊली खंडागळे यांच्या पत्नींचाही पराभव झाला. राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष पांडुरंग पवार यांच्या सूनबाईनाही मतदारांनी नाकारले. मतमोजणी केंद्राबाहेर विजयी उमेदवारांच्या समर्थकांनी जल्लोष करत विजय साजरा केला. निकालांमुळे तालुक्यातील राजकारणाला नवी दिशा मिळाल्याचे चित्र आहे.

**पंचायत समिती गणांतील निकाल**

राष्ट्रवादी, शिवसेना शिंदे, उद्धव गट आणि भाजप यांच्यात गणनिहाय लढत रंगली. शिंदे गटाने आळे, पिंपळवंडी, बेल्हे, राजुरी, नारायणगाव व वारूळवाडी आदी गणांत विजय मिळवत वर्चस्व प्रस्थापित केले; राष्ट्रवादीने उदापूर, डिंगोरे, ओतूर, धालेवाडी तर्फे हवेली, बोरी बुद्रुक आणि बारवमध्ये बाजी मारली. सावरगाव-कुसुरमध्ये उद्धव गटाचा, तर सावरगाव गणात भाजपचा विजय झाला.

## सारांश वृत्त

### सांबा येथे १९ कोटी रुपयांचे कोकेन जप्त

**जम्मू :** बनावट नोटा प्रकरणात अटक केलेल्या एका आरोपीच्या चौकशीत जम्मू आणि काश्मीरच्या सांबा जिल्ह्यात १९ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीचे कोकेन जप्त करण्यात आले, अशी माहिती पोलिसांनी सोमवारी दिली. ३ फेब्रुवारी रोजी पंजाब नॅशनल बँकेच्या एका शाखा व्यवस्थापकाने बारी ब्राह्मणा पोलिस ठाण्यात बनावट नोटा जमा केल्याबद्दल लेखी तक्रार दाखल केली. पोलिस प्रवक्त्याने सांगितले की, बँक अधिकाऱ्याने आरोप केला होता की डिजियाना आश्रमातील रहिवासी दिल मोहम्मदने ९,००० रुपयांच्या बनावट नोटा जमा केल्या होत्या.

### सुधागृहातून पाच मुलांचे पलायन

**मुरादाबाद (उत्तरप्रदेश):** येथील सरकारी देखरेख गृहातून पाच अल्पवयीन मुले भिंतीवरून पळून गेल्याची माहिती पोलिसांनी दिली. त्यापैकी दोघांना नंतर पकडण्यात आले, तर इतर तिघांचा शोध सुरू आहे. सर्कल ऑफिसर (सिव्हिल लाईन्स) कुलदीप गुप्ता म्हणाले की, ही घटना रविवारी पहाटे ३ वाजताच्या सुमारास सिव्हिल लाईन्स पोलिस स्टेशन हद्दीतील सरकारी निरीक्षण गृहात (किशोर) घडली. "पाचपैकी दोघांना सिव्हिल लाईन्स पोलिसांनी पकडले आहे.

### सीबीआयने केली लाडू भेसळीची पुष्टी

**विशाखापट्टणम :** आंध्र प्रदेश साधू परिषदेचे अध्यक्ष श्रीनिवासनंद सरस्वती यांनी सोमवारी आरोप केला की, तिरुपती लाडूंबाबत सीबीआयच्या अहवालात तूप भेसळीची पुष्टी झाली आहे. २० कोटी रुपयांच्या लाडूंमध्ये भेसळ करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. त्यांनी आरोप केला की पवित्र लाडू (पवित्र गोड) मध्ये भेसळ करण्यात "अन्न माफिया" सामील आहेत आणि "रसायनेयुक्त" लाडू खाल्ल्यानंतर भाविक आजारी पडू शकतात.

## विरोधी पक्षांकडून हालचालींना आला वेग

# ओम बिर्ला यांच्याविरोधात अविश्वास प्रस्ताव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याविरुद्ध अविश्वास प्रस्ताव आणण्याच्या दिशेने विरोधी पक्षांनी हालचाली सुरू केल्याचे संकेत मिळत आहेत. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या सुरुवातीपासूनच सुरू असलेल्या गदारोळ, सभागृह वारंवार तहकूब होणे आणि अध्यक्षपदाच्या निष्पक्षतेवर उपस्थित झालेल्या प्रश्नांमुळे हा मुद्दा ऐरणीवर आला आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी लोकसभेचे कामकाज सुरू होण्यापूर्वी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या निवासस्थानी अनेक विरोधी पक्षांच्या नेत्यांची बैठक झाली. या बैठकीत अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली असून,



अविश्वास प्रस्तावाबाबत प्राथमिक चर्चा झाल्याचे समजते.

राष्ट्रपतींच्या अभिभाषणानंतर सुरू झालेल्या अधिवेशनात लोकसभेचे कामकाज सलग काही दिवस विस्कळीत झाले. विरोधी पक्षांनी अध्यक्षांवर सत्ताधारी पक्षाला अधिक संधी देत विरोधकांचा आवाज दडपल्याचा आरोप केला आहे. वारंवार गोंधळाच्या कारणावरून सभागृह तहकूब करणे, काही सदस्यांचे निलंबन आणि विरोधी पक्षनेत्यांना बोलू न देण्याच्या घटनांमुळे तणाव वाढला. सभागृहात गोंधळ घातल्याच्या आरोपावरून आठ विरोधी खासदारांना निलंबित करण्यात आले. या कारवाईविरोधात विरोधकांनी तीव्र आक्षेप नोंदवला असून, निलंबन तात्काळ मागे घ्यावे, अशी मागणी केली आहे. अध्यक्षांची भूमिका सत्ताधारी पक्षाच्या बाजूने झुकलेली असल्याचा आरोप विरोधकांकडून सातत्याने केला जात आहे.

विरोधी पक्षांचा मुख्य आक्षेप म्हणजे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना सभागृहात बोलण्याची संधी न मिळणे. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावाच्या चर्चेदरम्यान राहुल गांधींनी माजी लष्करप्रमुख एम.एम. नरवणे यांच्या अप्रकाशित पुस्तकातील उताऱ्यांचा संदर्भ दिला होता. अध्यक्षांनी अप्रकाशित पुस्तकातील मजकूर वाचणे अयोग्य असल्याचे सांगत आक्षेप घेतला, त्यानंतर मोठा गदारोळ झाला. विरोधकांचे म्हणणे आहे की राहुल गांधींना पूर्णपणे बोलू दिले गेले नाही, ही संसदीय परंपरेची पायमल्ली आहे. याच पार्श्वभूमीवर अविश्वास प्रस्तावाचा मुद्दा पुढे आला आहे.

सर्व प्रमुख विरोधी पक्ष अविश्वास प्रस्ताव आणण्यावर सहमत असून, लोकसभा महासचिवांकडे त्याबाबतची नोटीस सादर करण्याची तयारी सुरू आहे. अध्यक्षपदाची निष्पक्षता, विरोधकांचे हक्क आणि संसदीय परंपरा या मुद्द्यांवर हा प्रस्ताव केंद्रित असण्याची शक्यता आहे. अविश्वास प्रस्ताव सादर झाल्यास, तो लोकसभेच्या इतिहासातील महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. सत्ताधारी आणि विरोधकांतील संघर्ष अधिक तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

## खर्गे यांना बोलू न दिल्याने राज्यसभेत गदारोळ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** काँग्रेस अध्यक्ष तथा विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांना बोलू न दिल्याच्या निषेधार्थ राज्यसभेतील विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सोमवारी सभागृहातून सभात्याग केला. प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान हा प्रकार घडल्याने सभागृहातील वातावरण तणावपूर्ण बनले.

प्रश्नोत्तराच्या तासात उभे राहत खर्गे यांनी, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावाच्या चर्चेत बोलण्याची संधी न दिल्याचा मुद्दा उपस्थित करण्याचा प्रयत्न केला. मात्र, राज्यसभेचे सभापती सी. पी. राधाकृष्णन यांनी हा विषय लोकसभेशी संबंधित असल्याचे सांगत त्यांना बोलण्याची परवानगी नाकारली. "आपण जे काही म्हणाल, ते अधिकृत नोंदीत घेतले जाणार नाही," असे सभापतींनी स्पष्ट केले. याआधी खर्गे यांनी, संसदेचे अधिवेशन सुरू असताना केंद्रीय



वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांनी भारत-अमेरिका व्यापार कराराबाबत सभागृहाबाहेर दिलेल्या वक्तव्यावरही आक्षेप नोंदवण्याचा प्रयत्न केला होता. त्यालाही सभापतींकडून परवानगी मिळाली नाही.

सभापतींनी खर्गे यांना रोखल्याने विरोधी पक्षातील सदस्य संतप्त झाले. संपूर्ण विरोधी बाकांवरील सदस्य उभे राहून जोरदार निषेध व्यक्त करू लागले. सभापतींनी प्रश्नोत्तराचा तास पुढे सुरू ठेवण्याचा प्रयत्न केला, मात्र विरोध कायम राहिला. अखेरीस, अध्यक्षांनी कामकाज सुरू ठेवल्याच्या निषेधार्थ विरोधी पक्षातील सदस्यांनी सभागृहातून बाहेर पडत सभात्याग केला. या घटनेमुळे संसदेत सत्ताधारी आणि विरोधी पक्षांतील संघर्ष पुन्हा एकदा तीव्र झाल्याचे चित्र दिसून आले.

## विद्यार्थिनींचा मातृत्व रजा हा हक्कच

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जबलपूर :** कामाच्या ठिकाणी उपलब्ध असलेले मातृत्व संरक्षणाचे लाभ शिक्षण घेणाऱ्या महिलांनाही समान रीतीने लागू झाले पाहिजेत. लग्न किंवा गर्भधारणा ही उच्च शिक्षणाच्या मार्गातील अडथळे ठरू शकत नाहीत, असे स्पष्ट निरीक्षण नोंदवत मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने शैक्षणिक संस्थांना विद्यार्थिनींसाठी मातृत्व व बालसंगोपन रजा देण्याचे तसेच नियमांत आवश्यक ती सवलत देण्याचे निर्देश दिले आहेत.

न्यायमूर्ती विवेक रुसिया आणि न्यायमूर्ती प्रदीप मित्तल यांच्या खंडपीठाने हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला. शिक्षण घेत असताना मातृत्वामुळे निर्माण होणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन संस्थांनी विद्यार्थिनींना मुख्य प्रवाहात सामावून घ्यावे, असे न्यायालयाने स्पष्ट केले. भोपाळ येथील बीयूएमएस अभ्यासक्रमाची विद्यार्थिनी रुमैसा अर्वा हिने या संदर्भात उच्च न्यायालयात धाव घेतली होती. पहिल्या वर्षात यशस्वी झाल्यानंतर दुसऱ्या वर्षात असताना तिचे लग्न झाले आणि त्यानंतर ती गर्भवती राहिली. २० नोव्हेंबर २०२४ रोजी तिने बाळाला जन्म दिल्यानंतर महाविद्यालयाकडे प्रसूती रजेची मागणी केली. मात्र, संस्थेने तिला उपस्थितीत केवळ १० टक्के सवलत दिली. परिणामी, आवश्यक उपस्थिती पूर्ण न झाल्याने तिला परीक्षेला बसण्यास मज्जाव करण्यात आला होता.

याचिकाकर्तीने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १४ ऑक्टोबर २०२१ च्या मार्गदर्शक सूचनांचा आधार घेतला. या सूचनांनुसार सर्व शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थिनींसाठी प्रसूती व बालसंगोपन रजेचे धोरण तयार करणे आवश्यक आहे. न्यायालयाने स्पष्ट केले की, शिक्षण घेत असताना लग्न किंवा गर्भधारणा अडथळा ठरता कामा नये. अंतिम परीक्षेसाठी आवश्यक उपस्थिती पूर्ण करण्यासाठी विशेष सवलत किंवा समायोजन दिले पाहिजे.

## काँग्रेसी महिला खासदारांचे ओम बिर्लांना पत्र

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** लोकसभेतील काँग्रेसच्या महिला खासदारांनी सभापती ओम बिर्ला यांना सोमवारी पत्र लिहून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभागृहातील अनुपस्थितीचे समर्थन करण्यासाठी सत्ताधारी पक्षाच्या दबावाखाली आपल्यावर गंभीर आणि निराधार आरोप केल्याचा दावा केला आहे.

सभापतींनी लोकसभेचे निष्पक्ष व संवैधानिक संरक्षक म्हणून भूमिका बजावावी, असे आवाहन त्यांनी केले.

महिला खासदारांच्या पत्रात नमूद करण्यात आले आहे की, राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावाच्या चर्चेदरम्यान पंतप्रधानांनी उत्तर देण्यासाठी सभागृहात न येण्यामागे विरोधी पक्षाची कोणतीही धमकी नव्हती. "आम्ही केवळ सरकारकडून जबाबदारीची मागणी केली. पंतप्रधानांची अनुपस्थिती ही आमच्यामुळे नव्हे, तर विरोधाला सामोरे जाण्याची तयारी नसल्यामुळे होती," असा आरोप पत्रात करण्यात आला आहे. या पत्रावर प्रियंका गांधी वाड्रा, ज्योतिमणी, आर. सुधा, वर्षा गायकवाड आणि ज्योत्स्ना महंत यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

सभापती बिर्ला यांनी यापूर्वी सभागृहात "ठोस माहिती" असल्याचा दावा करत, काही काँग्रेस सदस्य पंतप्रधानांच्या आसनाकडे जाऊन "अनपेक्षित कृत्य" करू शकतात, असे वक्तव्य केले होते. त्याच पार्श्वभूमीवर महिला खासदारांनी हे आरोप खोटे, बदनामीकारक आणि असंवैधानिक असल्याचे सांगत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. "आम्ही भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे खासदार आहोत; प्रेम, शांती, संवैधानिक मूल्ये आणि मानवी प्रतिष्ठेवर विश्वास ठेवतो. हिंसाचार वा धमकी आमची भूमिका नाही," असे त्यांनी स्पष्ट केले.

पत्रात सभापतींच्या अधिकारांवरही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना सलग चार दिवस बोलण्याची संधी न देणे अभूतपूर्व असल्याचे सांगत, इंडिया आघाडीतील आठ खासदारांचे निलंबन आणि भाजपच्या एका खासदाराच्या कथित आक्षेपार्ह वक्तव्यावर कारवाई न झाल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. "यामुळे सभापतींचे निर्णय सरकारच्या प्रतिसादावर अवलंबून आहेत का, असा गंभीर प्रश्न निर्माण होतो," असे खासदारांचे म्हणणे आहे. खासदारांनी सभापतींच्या कार्यालयाबद्दल आदर व्यक्त करतानाच, पारदर्शकता आणि निष्पक्षता हाच लोकसभेची प्रतिष्ठा व विश्वासार्हता पुनर्संचयित करण्याचा एकमेव मार्ग असल्याचे नमूद केले.

## भारत–कॅनडा सुरक्षा सहकाराला नवे वळण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओटावा :** भारत आणि कॅनडाने राष्ट्रीय सुरक्षा तसेच कायदा अंमलबजावणीच्या क्षेत्रात परस्पर सहकार्य वाढवण्यासाठी संयुक्त योजना विकसित करण्यावर सहमती दर्शवली आहे. अमली पदार्थांची तस्करी, आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी नेटवर्क आणि सायबर सुरक्षेसारख्या आव्हानांना तोंड देण्यासाठी दोन्ही देश संबंधित यंत्रणांमध्ये समन्वय मजबूत करणार असून संपर्क अधिकारीही नियुक्त करण्यात येणार आहेत.

कॅनडाची राजधानी ओटावा येथे भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल आणि कॅनडाच्या नॅथली ड्रोइन यांच्यात झालेल्या बैठकीत या मुद्द्यांवर चर्चा झाली. या चर्चेला द्विपक्षीय सुरक्षा संवादाचा भाग म्हणून महत्त्व दिले जात आहे. २०२३ मध्ये खलिस्तानी फुटीरतावादी हरदीप सिंग निज्जर यांच्या हत्येच्या प्रकरणावरून भारत आणि कॅनडामधील संबंध तणावपूर्ण झाले होते. त्या पार्श्वभूमीवर दोन्ही देश संबंध सुधारण्याच्या दिशेने पावले टाकत असल्याचे या बैठकीतून स्पष्ट झाले आहे. परराष्ट्र मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, दोन्ही देशांनी त्यांच्या नागरिकांच्या सुरक्षेसाठी राबवण्यात येणाऱ्या उपक्रमांमध्ये झालेल्या प्रगतीची दखल घेतली. राष्ट्रीय सुरक्षा आणि कायदा अंमलबजावणीच्या मुद्द्यांवर संयुक्तपणे काम करण्यासाठी ठोस यंत्रणा उभारण्यावर एकमत झाले आहे.

संबंधित भारतीय आणि कॅनेडियन एजन्सींमधील कार्यरत संबंध अधिक दृढ करण्यासाठी संपर्क अधिकारी नेमण्यात येणार असून, यामुळे माहितीची देवाणघेवाण अधिक जलद आणि प्रभावी होणार आहे. विशेषतः बेकायदेशीर अमली पदार्थांची तस्करी, आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी नेटवर्क, सायबर गुन्हेगारी तसेच फसवणूक आणि इमिग्रेशन अंमलबजावणीसारख्या विषयांवर सहकार्य वाढवले जाणार आहे.

## लोकसभेत गदारोळ; कामकाज तहकूब

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** केंद्रीय अर्थसंकल्पावरील चर्चेला सुरुवात होण्यापूर्वी विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना बोलण्याची परवानगी द्यावी, या मागणीवरून सोमवारी लोकसभेत सत्ताधारी आणि विरोधी पक्षांमध्ये तीव्र गदारोळ झाला. दोन्ही बाजू आपल्या भूमिकेवर ठाम राहिल्याने अखेर लोकसभेचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आले.

सकाळी दोन वेळा तहकूब झाल्यानंतर दुपारी २ वाजता सभागृह पुन्हा सुरू झाले. त्या वेळी अध्यक्षस्थानी असलेल्या संध्या रे यांनी काँग्रेसचे खासदार शशी थरूर यांना अर्थसंकल्पावरील चर्चेला सुरुवात करण्यास सांगितले. मात्र, थरूर यांनी हस्तक्षेप करत विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना चर्चेपूर्वी काही मुद्दे मांडण्याची संधी द्यावी, अशी मागणी अध्यक्षांकडे केली. यावर संध्या रे यांनी, गांधींना अर्थसंकल्पावर बोलायचे असल्यास कोणतीही हरकत नसल्याचे स्पष्ट करत त्यांना थेट चर्चेला सुरुवात करण्याचे आवाहन केले. मात्र, राहुल गांधी यांनी सांगितले की, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला आणि विरोधी पक्षाच्या काही खासदारांमध्ये झालेल्या बैठकीत अर्थसंकल्पीय चर्चेपूर्वी मुद्दे मांडण्यास परवानगी देण्यावर एकमत झाले होते. आता त्या निर्णयापासून अध्यक्ष माघार घेत असल्याचा आरोप त्यांनी केला. अध्यक्ष संध्या रे यांनी असा कोणताही करार आपल्या माहितीत नसल्याचे सांगत, कोणतीही पूर्वसूचना न देता मुद्दे मांडण्याची परवानगी देता येणार नसल्याचे स्पष्ट केले. यानंतर संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी हस्तक्षेप करत, असा कोणताही करार झालेला नसल्याचे सांगितले. विरोधकांना सभापतींबाबत काही बोलायचे असल्यास, अध्यक्ष ओम बिर्ला सभागृहात उपस्थित असताना त्यावर चर्चा व्हावी, असेही त्यांनी नमूद केले. या मुद्द्यावर सभागृहातील इतर सदस्यांनाही बोलण्याची संधी दिली जाईल आणि व्यापक चर्चा होईल, असे आश्वासन रिजिजू यांनी दिले. मात्र, सत्ताधारी आणि विरोधी पक्षांमध्ये सहमती न झाल्याने गदारोळ कायम राहिला. अखेर परिस्थिती नियंत्रणात न आल्याने संध्या रे यांनी लोकसभेचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब केल्याची घोषणा केली.

## उत्तर प्रदेश हे एक यशस्वी राज्य

**लखनौ :** उत्तर प्रदेशने स्वतःला "अडथळ्याच्या राज्यातून" एक "प्रगतीशील राज्य" बनवले आहे, असे राज्यपाल आनंदीबेन पटेल यांनी सांगितले. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी उत्तर प्रदेश विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीला संबोधित करताना, पटेल यांनी योगी आदित्यनाथ यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या कामगिरीवर प्रकाश टाकला. विरोधी पक्ष असलेल्या समाजवादी पक्षाच्या सदस्यांनी विधानसभेच्या आत आणि बाहेर निदर्शने केली.

## एसआयआर प्रकरणाच्या सुनावणीत सरन्यायाधीश संतप्त

# तुम्ही भाजी मंडईत आहात का?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** अनेक राज्यांमध्ये सुरू असलेल्या एसआयआर (सिरीयल इन्स्पेक्शन) प्रक्रियेला आव्हान देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात वकील म्हणून हजर राहिलेल्या ममता बॅनर्जी यांना मोठा धक्का बसला आहे. सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने स्पष्ट केले की एसआयआर प्रक्रियेला कोणतीही स्थगिती दिली जाणार नाही. न्यायालय कोणतेही अडथळे निर्माण करण्याची परवानगी देणार नाही. सर्व राज्यांनी हे समजून घेतले पाहिजे असे सरन्यायाधीशांनी सांगितले. या संदर्भात आवश्यक असलेली कोणतीही स्पष्टता सर्वोच्च न्यायालय देईल, असेही त्यांनी सांगितले.

पश्चिम बंगालमधील एसआयआर प्रकरणावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू असताना सोमवारी मोठा गोंधळ उडाला. सुनावणीदरम्यान सुव्यवस्था आणि समन्वयाचा अभाव दिसून आल्याने सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. "सगळे एकाच वेळी बोलत असाल तर सुनावणी कशी होणार?



तुम्ही भाजी मंडईत बसला आहात की कोर्ट क्रमांक १ मध्ये?" असा सवाल करत त्यांनी वकिलांना फटकारले. शिस्त पाळली नाही तर न्यायालयातून बाहेर काढण्याचा इशाराही त्यांनी दिला. या प्रकरणात पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, तृणमूल काँग्रेसच्या खासदार डोला सेन आणि डेरेक ओ'ब्रायन यांनी दाखल केलेल्या याचिकांवर सुनावणी सुरू आहे. याचिकाकर्त्यांचे वकील चंद्र उदय सिंह यांनी नोटीसकडे लक्ष देण्याची गरज असल्याचा युक्तिवाद केला.

सुनावणीदरम्यान सरन्यायाधीशांनी राज्य सरकारला उद्देशून सांगितले की, आता ८,५०० हून अधिक अधिकारी तैनात करण्यात आले आहेत. "हे पाऊल आधी उचलले गेले असते, तर कदाचित ते स्वीकारले गेले असते," असे निरीक्षण त्यांनी नोंदवले.

सरन्यायाधीशांनी विचारले की, पश्चिम बंगाल सरकारकडून कोणता जबाबदार अधिकारी न्यायालयात उपस्थित आहे. यावर याचिकाकर्त्यांनी सांगितले की, राज्याचे माजी मुख्य सचिव आणि सध्या मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव मनोज पंत न्यायालयात उपस्थित आहेत. सरन्यायाधीशांनी स्पष्ट केले की खरा मुद्दा ३०० ग्रुप 'ए' ईआरओ अधिकाऱ्यांची नावे उपलब्ध आहेत का, हाच आहे. मनोज पंत यांनी न्यायालयाला सांगितले की, २९२ ईआरओंची नावे सादर करण्यात आली असून हे सर्व एसडीएम दर्जाचे ग्रुप 'ए' अधिकारी आहेत. तसेच ८,५२५ असिस्टंट ईआरओ नियुक्त करण्यात आले आहेत. अधिकाऱ्यांच्या यादीत सुमारे ६५ टक्के ग्रुप 'बी', १०–१२ टक्के ग्रुप 'सी' आणि उर्वरित ग्रुप 'ए' अधिकारी असल्याची माहिती त्यांनी दिली.

## एआयएमआयएमच्या नेत्याचे मोहन भागवत यांना प्रत्युत्तर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** सरसंघचालक मोहन भागवत यांच्या लोकसंख्येबाबतच्या भूमिकेवरून राजकीय वातावरण तापले असताना, एआयएमआयएमचे उत्तर प्रदेश अध्यक्ष शौकत अली यांनी मुरादाबादमधील जाहीर सभेत वादग्रस्त वक्तव्य केले. लोकसंख्येच्या मुद्द्यावर भाष्य करताना त्यांनी थेट प्रतिवाद करत, "आजपासून आम्ही 'हम दो हमारे दो दोजार' असा नारा देऊ," असे विधान केले.

सभेत बोलताना शौकत अली म्हणाले की, "आम्हाला आठ मुले आहेत, माझ्या मोठ्या भावाला सोळा मुले आहेत. आमची आई सत्त्याण्णव वर्षांची असून तिला किमान ७२ नातवंडे आहेत." तुम्हाला आमच्या संख्येची इतकी काळजी का वाटते? जे स्वतः लग्न करत नाहीत, तेच लोक लोकसंख्येवर उपदेश देत आहेत." त्यांनी पुढे असेही म्हटले की, "हिंदू भावांना चार नव्हे तर चौदा मुले असावीत, तेव्हाच देश मजबूत होईल," असेही त्यांनी सांगितले.

या भाषणात शौकत अली यांनी समाजवादी पक्षाचे नेते आणि माजी मंत्री कमाल अख्तर यांच्यावरही निशाणा साधला. "मी मुस्लिम आहे आणि माझ्यावर आरोप करणारी व्यक्तीही मुस्लिमच आहे. मला भाजपची 'बी-टीम' म्हटले जाते. मग मुरादाबादमधील दारू दुकाने आणि गझल बार कोणाचे होते?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

## ५४ हजार कोटींच्या लुटीवर सर्वोच्च न्यायालयाचे कठोर निरीक्षण

# डिजिटल फसवणूक म्हणजे थेट दरोडाच आहे..!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** डिजिटल फसवणुकीच्या माध्यमातून ५४ हजार कोटी रुपयांहून अधिक रकमेची उचलबांगडी होणे ही थेट दरोडा किंवा लूटच असल्याचे ठाम मत सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी व्यक्त केले. अशा गंभीर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी रिझर्व्ह बँक, बँका आणि दूरसंचार विभाग यांच्याशी सल्लामसलत करून कार्यपद्धती तयार करण्याचे निर्देश न्यायालयाने केंद्र सरकारला दिले.

सरन्यायाधीश सूर्यकांत तसेच न्यायमूर्ती जयमाल्या बागची आणि एन. व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठाने डिजिटल



फसवणुकीतून पळवण्यात आलेली रक्कम अनेक लहान राज्यांच्या वार्षिक अर्थसंकल्पापेक्षा अधिक असल्याकडे लक्ष वेधले. या गुन्ह्यांमध्ये बँक अधिकाऱ्यांचा संगनमत किंवा निष्काळजीपणा कारणीभूत ठरू शकतो, असे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने आरबीआय आणि बँकांनी वेळेवर व ठोस कारवाई करण्याची गरज अधोरेखित केली.

गृह मंत्रालयाला आरबीआयने तयार केलेल्या मानक कार्यपद्धती तसेच दूरसंचार विभागाच्या निर्णयांचा विचार करून चार आठवड्यांत मसुदा सामंजस्य करार तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सायबर-सक्षम फसवणूक रोखण्यासाठी संशयास्पद व्यवहार आढळल्यास तात्पुरते डेबिट कार्ड स्थगित ठेवण्याबाबत आरबीआयने एसओपी तयार केल्याची नोंदही न्यायालयाने घेतली.

डिजिटल अटक प्रकरणांबाबत न्यायालयाने सीबीआयला अशा प्रकरणांची ओळख पटवण्याचे निर्देश दिले असून, गुजरात आणि दिल्ली सरकारांना या प्रकरणांच्या तपासासाठी केंद्रीय तपास संस्थेला परवानगी देण्यास सांगितले आहे. तसेच पीडितांना भरपाई देण्यासाठी आरबीआय, दूरसंचार विभाग आणि संबंधित यंत्रणांनी संयुक्त बैठक घेऊन एक ठोस चौकट तयार करावी, असे निर्देश देण्यात आले. डिजिटल अटक प्रकरणांतील पीडितांसाठी भरपाई ठरवताना व्यावहारिक आणि उदार दृष्टिकोन आवश्यक असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. या प्रकरणाची पुढील सुनावणी चार आठवड्यांनंतर होणार असून, तोपर्यंत अधिकाऱ्यांना अद्ययावत स्थिती अहवाल सादर करण्यास सांगण्यात आले आहे. १६ डिसेंबर रोजीही सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला डिजिटल अटक प्रकरणांतील पीडितांच्या भरपाईबाबत ॲमिकस क्युरीने दिलेल्या सूचनांचा विचार करण्यास सांगितले होते. त्याचवेळी सायबर गुन्हेगारांकडून देशाबाहेर पाठवली जाणारी प्रचंड रक्कम ही गंभीर बाब असल्याची चिंता व्यक्त करण्यात आली होती.

डिजिटल अटक हा सायबर गुन्ह्यांचा वाढता प्रकार असून, त्यात फसवणूक करणारे ऑडिओ किंवा व्हिडिओ कॉलद्वारे स्वतःला पोलिस, न्यायालयीन अधिकारी किंवा सरकारी कर्मचारी म्हणून सादर करतात. पीडितांना धमकावून, मानसिक दबाव टाकून त्यांच्याकडून पैसे उकळले जातात. १ डिसेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयाने सीबीआयला देशभरातील डिजिटल अटक प्रकरणांची एकत्रित चौकशी करण्याचे निर्देश दिले होते. तसेच सायबर गुन्हेगारांकडून वापरल्या जाणाऱ्या बँक खात्यांचा शोध घेण्यासाठी आणि ती गोठवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर का केला जात नाही, असा सवाल न्यायालयाने आरबीआयला केला होता.